# बृहन्मुंबई महानगरपालिका

## बा.य.ल. नायर धर्मा. रूग्णालय आणि टो.रा. वैद्यकीय महाविद्यालय

**पुस्तीका क्र. ०१**

खात्याची संघटना, कार्ये

आणि कर्तव्ये हयाबाबतचा

तपशील

**नियमपुस्तीका क्र. ०१**

# बृहन्मुंबई महानगरपालिका

## बा.य.ल. नायर धर्मा. रूग्णालय आणि टो.रा. वैद्यकीय महाविद्यालय

**बा.य.ल. नायर धर्मा रुग्णालय**

सन १९२१ मध्ये राष्ट्रपित्याच्या हाकेला प्रतिसाद म्हणून ४ विद्यार्थ्यांनी नवीन राष्ट्रीय संस्था सुरु करण्याच्या उद्देशाने, ब्रीटीश सरकार चालवित असलेले ग्रँट वैद्यकीय महाविद्यालय सोडले आणि टोपीवाला राष्ट्रीय वैद्यकीय महाविद्यालय उदयास आले. प्रारंभी, ही एक वैद्यकीय शाळा होती व तिची नोंदणी कॉलेज ऑफ फीजिशियन्स व सर्जन्स यांचेकडून परवानाधारक पाठयक्रमासाठी करण्यात आली होती. सन १९४६ मध्ये संस्थेच्या रौप्यमहोत्सवी वर्षात, बृहन्मुंबई महानगरपालिकेने सदर महाविद्यालय ताब्यात घेतले व ते पदवी पाठयक्रमासाठी मुंबई विद्यापिठास संलग्न करण्यात आले. सदर महाविद्यालयास टोपीवाला देसाई कुटुंब आणि सुविख्यात लोकहितेची व्यक्ती डॉ. आनंदराव ल. नायर यांचेकडून सढळ हस्ते देणगी मिळाली, म्हणून त्यास टोपीवाला राष्ट्रीय वैद्यकीय महाविद्यालय व बाई यमुनाबाई ल. नायर धर्मा रुग्णालय अशी नावे देण्यात आली. आज या जोड संस्थी देशातील अग्रगण्य वैद्यकीय संस्थांपैकी संस्था आहेत.

हे रुग्णालय मुंबई सेंट्रल रेल्वेस्थानकापाशी असून, येथे संपूर्ण भारतातून उपचाराकरिता रुग्ण येतात. हया संस्थेच्या आवारात २८ इमारती आहेत. हया रुग्णालयामध्ये एकूण १६२३ रुग्णशय्या आहेत. १८०० ची मान्यता देण्यात आली आहे व ते भविष्यात लवकरच अस्तित्वात येतील. हया रुग्णालयात साधारणत: दरवर्षी ५५४०० आंतररुग्ण, बाहयरुग्ण वैद्यकीय उपचार २८०००० घेतात. तसेच २१,००० शस्त्रक्रीया व ४२०० प्रसुती केल्या जातात. या रुग्णालयात औषधोपचारासाठी येणा-या रुग्णांकडून परिपत्रक् क्र.टिआरव्ही/२०४ दि.०९.०५.२००० व क्र.टिआरव्ही/१४१ दि.०९.०५.२००१ अन्वये विविध सुविधांचा नाममात्र सेवाशुल्क रुग्णांकडून आकारुन सर्वोत्कृष्ट व दर्जेदार रुग्णसेवा पुरविण्याचे प्रयत्न केले जातात.

नेहमीच्या वैद्यकीय सेवांव्यतिरिकत, मूत्रपिंडशास्त्र मज्जातंतू, शल्यचिकित्साशास्त्र,

आंतरासर्गविज्ञान, जठरांत्र शल्यचिकित्साशास्त्र, ह्रदयरोग शास्त्र आणि ह्रदय वाहिनी व उरोविकृती चकित्साशास्त्र या शाखांमधील अतिविशेष सेवासुध्दा येथे पुरविण्यात येतात.

हया रुग्णालयात वैद्यकीय, शस्त्रक्रीया, ह्रदयरोग व नवजात अर्भके या सर्व रुग्णांसाठी सुसज्ज असे अतिदक्षता विभाग आहेत. तर मुलांसाठी स्वतंत्र अतिदक्षता विभाग आहे. अपघात विभागाच्या बाजूलाच आघात उपचार कक्ष (ट्रॉमा वार्ड) आहे. अन्न व औषध प्रशासनाची मान्यता असलेली रुग्णालयाची स्वत:ची रक्तपेढी व रक्त घटक उपचारकेंद्र (कंपोनंट थेरपी युनिट) असून सदर रक्तपेढी "फेडरेशन ऑफ ब्लड बँक्स ची सदस्य आहे आणि प्रस्तुत केंद्रात अष्टौप्रहर सेवा उपलब्ध केली जाते.

हया रुग्णालयात होल बॉडी सी.टी.स्कॅनर, कार्डिएक कॅथेटराझेशन पध्दती आणि स्पेक्ट कॅमेरा इत्यादि यंत्रसामुग्री असून, हया रुग्णालयात अशा प्रकारचा स्पेक्ट कॅमेरा प्रथमच बसविला आहे आणि या कॅमे-याच्या सहाय्याने वैद्यकशास्त्राच्या विविध क्षेत्रातील रोगांचे अचूक निदान करता येते.

कस्तुरबा रुग्णालयाच्या आवारात असलेल्या, नायर रुग्णालयाच्या स्वतंत्र हायपरबेरिक ऑक्सिजन थेरपी चेंबरचा मुंबईतील सार्वजनिक रुग्णालयांमध्ये दुसरा क्रमांक लागतो. मुंबईतील पहिल्या क्रमांकाचे स्वतंत्र हायपरबेरिक ऑक्सिजन थेरपी चेंबर, वडाळा येथील पोर्ट ट्रस्ट रुग्णालय येथे आहे.

या रुग्णालयाने वैद्यकीय क्षेत्रातील ब-याच बाबींचा उदा. पहिली ओपन हार्ट सर्जरी आणि पहिले पेरिटोनियल डायलेसिस याचा शुभारंभ करण्याचा मान मिळविला आहे. त्वचारोग विभागात पुवा थेरपी देणारे हे पहिले रुग्णालय आहे.

**टोपीवाला राष्ट्रीय वैद्यकीय महाविद्यालय**

हे महाविद्यालय सन १९२१ च्या राष्ट्रीय चळवळीच्या वेळी, वैद्यकीय परवानाधारकांना शिक्षण देणारी संस्था म्हणून प्रथम सुरु करण्यात आले. त्यावेळी ते राष्ट्रीय वैद्यकीय महाविद्यालय म्हणून ओळखले जात असे. सन १९४६ मध्ये महाविद्यालयाचा दर्जा पदवी परीक्षेपर्यंत वाढविण्यात आला व ऑक्टोबर १९४६ मध्ये ते

मुंबई विद्यापीठास संलग्न करण्यात आले व महानगरपालिकेने ते आपल्या ताब्यात घेतले. टोपीवाला राष्ट्रीय वैद्यकीय महाविद्यालय हे संपूर्ण महाराष्ट्रात प्रख्यात असलेले वैद्यकीय महाविद्यालय आहे.

हया महाविद्यालयात प्रतिवर्षी एम.बी.बी.एस. अभ्यासक्रमासाठी १२० विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. सध्या येथे ६३५ पदवीपूर्व पदविका विद्यार्थी ३६० विद्यार्थ्यी आणि ५१ पदव्युत्तर पदविका विद्यार्थी एम.एस्सी., पी.एच.डी.चे शिक्षण घेत आहेत.

हृदयशास्त्र, हृदयशल्यचिकित्सा, मज्जातंतू, शल्यचिकित्सा विभाग, मूत्रशास्त्र विभाग, आंतरासर्ग विभाग, जठरांत्र विभाग (वैद्यकीय), सुघटन शल्य चिकित्सा विभाग आदिसारख्या अतिविशेष विषयांमध्ये प्रशिक्षाण देण्यासाठी भारतीय वैद्यकीय मंडळाने संस्थेस मान्यता दिली आहे. हया संस्थेमार्फत श्रवणशास्त्र व वाकविकृती उपचार पध्दती शाळा चालविली जाते आणि येथे मुंबई विद्यापीठाच्या श्रवणशास्त्र व वाकविकृती उपचार पध्दतीच्या पदवी अभ्यासक्रमासाठी १० विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. ही सुविधा फक्त या संस्थेतच उपलब्ध आहे.

या रुग्णालयात सन १९९० मध्ये व्यवसायोपचार आणि भौतिकोपचार शाळा सुरु करण्यात आली असून, येथे दरवर्षी अनुक्रमे १० विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमासाठी प्रवेश दिला जातो. सध्या व्यवसायोपचार आणि भौतिकोपचार अभ्यासक्रमासाठी ४० विद्यार्थी आहेत.

हया महाविद्यालयात नर्सिंग कौन्सिल ऑफ इंडियाच्या मान्यतेने चालविल्या जाणा-या परिचारीका विद्यालयात दरवर्षी १०० विद्यार्थीनींना प्रवेश दिला जातो.

प्रतिवर्षी खालीलप्रमाणे विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो.

| **अ.क्र.** | **अभ्यासक्रमाचे नाव** | **प्रवेशित क्षमता प्रतीवर्षी** |
|---|---|---|
| ०१. | एम.बी.बी.एस. | १२० |
| ०२. | बी.पी.एम.टी | २५ |
| ०३. | बी.पी.टी.एच. | १० |
| ०४. | बी.ओ.टी.एच. | १० |
| ०५. | बी.ए.एस.एल.पी. | १० |

| अ.क्र. | अभ्यासक्रमाचे नाव | प्रवेशित क्षमता प्रतीवर्षी |
|---|---|---|
| ०१. | एम.डी.एस.सी. डिप्लोमा | १५२ |
| ०२. | सुपर स्पेशालिटी | २० |
| ०३. | एम.ओ.टी.एच. | १० |
| ०४. | एम.पी.टी.एच. | १० |
| ०५. | डी.एम.एल.टी. | १० |
| ०६. | एम.एस.सी. पी.एस.डी. | 15 |
| ०७. | फेलोशिप | १० |

**ग्रंथालय**

टोपीवाला राष्ट्रीय वैद्यकीय महाविद्यालय हया संस्थेतर्फे एक सुव्यवस्थित व सुस्थापित ग्रंथालय चालविण्यात येत असल्यामुळे त्यातील माहिती ही सहजपणे सर्व वाचकांना उपलब्ध होते. ही ग्रंथालयीन सेवा एकंदरीत ५४५ पदवित्तर व निवासी वैद्यकीय विद्यार्थी ६३५ पदवीपूर्व विद्यार्थी तसेच ३२५ शिक्षकांबरोबरच इतरही वैद्यकीय कर्मचारी उदा. वैज्ञानिक अधिकारी, संशोधन अधिकारी, संशोधन सहाय्यक, परिचारीका, मानसशास्त्रज्ञ, आहारतज्ञ, वैद्यकीय सामाजिक सेवक यांना उपलब्ध झाले.

मुंबईमधील इतर संस्थेतील शिक्षक व विद्यार्थी वाचक वर्ग यांना संस्थेचे परवानगी पत्र व योग्य ओळखपत्राद्वारे हया ग्रंथालयाची सेवा उपलब्ध होऊ शकते. बाहेरील वैद्यकीय वाचक वर्ग, औषध कंपन्या, संयुक्त संस्था तसेच माजी विद्यार्थ्यांकरिता पैसे भरुन की जे पैसे विभाग उत्कर्ष निधीमध्ये जमा करुन हया सेवेचा लाभ घेता येतो.

ग्रंथालयात ४०९४८ पुस्तके तसेच, वैद्यकीय नियतकालिकांचे २५४६० इतके बांधणी केलेले खंड आहेत. ग्रंथालयात १३२ विदेशी / भारतीय नियतकालिके उपलब्ध आहेत. आपल्याकडे असणा-या ४३ विभागीय ग्रंथालयातर्फे खात्याच्या वैयक्तिक गरजेप्रमाणे पुस्तके उपलब्ध करुन दिली जातात.

**नायर गोल्डन ज्युबिली रिसर्च फाऊंडेशन एंड रिसर्च सोसायटी**

एन.जी.जे.आर.एफ. हयांच्या सौजन्याने अनेक व्याख्याने आयोजित केलेली होती.
विद्यापीठ परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना पारितोषिक देण्यात आले.
एन.जी.जे.आर.एफ. तर्फे वैज्ञानिक कार्यशाळा, चर्चासत्रे आणि परिषदांकरिता आर्थिक सहाय्यक पुरविण्यात आले.

**प्लॅटीनम ज्युबिली फाऊंडेशन –**

सन १९९५-१९९६ मध्ये अमृत महोत्सवी उत्सव समिती स्थापना केली. हया समितीकडे माजी नायर वासियांकडून अनिवासी भारतीयांकडून (एन.आर.आय) आणि सदर रुग्णालयाची स्थापना झाल्यानंतर सुरुवातीच्या वर्षात संबंधित असलेल्या कंपन्यांकडून निधी गोळा करण्याची जबाबदारी सोपविण्यात आली, रुग्णांची काळजी चांगल्या रितीने घेण्यासाठी आणि कामाची गुणवत्ता वाढविण्यासाठी नविन कार्डीएक मॉनिटर्स, पल्स ऑक्सिमीटर्स, संगणक आदीसारखी अद्ययावत साधने खरेदी करण्यासाठी हया निधीचा विनियोग करण्यात आला. सप्टेंबर १९९५ मध्ये बा.य.ल. नायर धर्मा रुग्णालय व टो.रा.वैद्यकीय महाविद्यालयाचा अमृत महोत्सव साजरा करण्यात आला.

## शरीररचना शास्त्र विभाग

**विभागातील कार्य आणि कर्तव्ये -**

१) शरीरचना शास्त्र विभागामध्ये उपस्नातक विद्यार्थ्यांना (प्रथम विषय) एम.बी.बी.एस., बी.डी.एस., एफ.वाय. ओटी/पीटी, ऐ.एस.टी., नर्सिंग व बी.पी.एम.टी. यांना खालील विषयावर व्याख्याने, टयुटोरीयल, शवविच्छेदन प्रात्यक्षिक प्रयोग व सेमिनार व सामुहिक चर्चा घेतली जाते.

२) स्नातकोत्तर विद्यार्थ्यांना एम.डी. अनॅटॉमी हयांना त्यांच्या प्रबंधामध्ये मार्गदर्शन केले जाते व प्रशिक्षण दिले जाते, एम.डी.एस. पार्ट -१ करिता व्याख्याने घेतली जातात.

३) उपस्नातक विद्यार्थ्यांचे मुल्यमापन केले जाते. (प्रथम वर्षीय एम.बी.बी.एस., बी.डी.एस., एफ.वाय. ओटी/पीटी, ऐ.एस.टी. व बी.पी.एम.टी.) त्यांचा रेकॉर्ड ठेवला जातो. त्यांच्या मार्कांची नोंद ठेवली जाते.

४) महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या परीक्षा (एम.बी.बी.एस., बी.डी.एस.) घेतले जाते.

५) अभ्यासात जे विद्यार्थी कच्चे आहेत त्यांचे कौंसिलिंग करणे व त्यांची अभ्यासात सुधारणा करणे.

६) एम.सी.क्यु बॅक, बोन बॅक व एक्स रे बॅक बनविणे.

## शरीरक्रियाशास्त्र विभाग

**विभागातील दैनंदिन कार्ये -**

१) शरीरक्रियाशास्त्र हा विषय (व्याख्यान, प्रात्यक्षिक, चर्चासत्र निदर्शन) हे सर्व प्रथम वर्ष एम.बी.बी.एस., प्रथम वर्ष बी.डी.एस., प्रथम वर्ष बी.पी.टी.एच., बी.ओ.टी.एच., ए.एस.टी., बी.पी.एम.टी. आणि नर्सिंग या पदवीपूर्वी विद्यार्थ्यांना शिकविणे.

२) पदव्युत्तर विद्यार्थ्यांना शरीरक्रियाशास्त्र हा विषय शिकविणे. आणि त्यांना संशोधनासाठी मार्गदर्शन करणे.

३) प्रथम वर्ष एम.बी.बी.एस., बी.डी.एस., बी.पी.टी.एच., बी.ओ.टी.एच., ए.एस.टी., बी.पी.एम.टी. या पदवीपूर्वी विद्यार्थ्यांचे वेळोवेळी मुल्यांकन करणे.

४) नाशिक विद्यापिठाच्या नियमानुसार माहिती तयार ठेवणे. आणि मार्कांचे अंतर्गत मुल्यांकन करणे.

५) पदवीपूर्व आणि पदव्युत्तर मुलांच्या (नाशिक विद्यापिठाच्या विद्यापिठ परीक्षा घेणे.)

६) नाशिक विद्यापिठ आणि मेडिकल कॉन्सिल ऑफ इंडियाच्या तपासणीच्या संदर्भात कागदपत्र तयार ठेवणे.)

**विशेष विभागीय कार्ये -**

१) मुलांना शिकविण्याकरिता आलेख, तक्ते मॉडेल आणि पारदर्शिक इत्यादी गोष्टींची तयारी करणे.

२) म्युझिअमसाठी मॉडेल्स तयार करणे.

३) प्रात्यक्षिक वर्गासाठी लेखी अभ्यास तयार करणे.

४) एम.सी.क्यु. ची बॅक तयार करणे.

५) पदव्युत्तर विद्यार्थ्यांकरिता सुक्ष्मदर्शकता, जर्नल क्लब मिटिंग आणि प्रात्यक्षिक वर्ग घेणे.

६) मुलांच्या अभ्यासक्रमांची विशेष वाढ होण्याकरिता त्यांच्या बरोबर विशेष मुलाखती घेणे.

७) कार्यशाळा आणि परिषदेमध्ये भाग घेण्यासाठी विशेष तयारी करणे.

८) संशोधनाचे काम करणे.

९) क्वीझ यांचे नियोजन केले.

१०) चार (४) पदवीपूर्व विद्यार्थी एम.डी. शरीरक्रियाशास्त्राची परीक्षा पास झाले.

११) एक कर्मचारी ॲनिमल इथिक्स कमिटीमध्ये आहे.

१२) एक कर्मचारी पदव्युत्तर ॲकेडेमिक या कमिटीचा सभासद आहे.

१३) एक कर्मचारी ॲन्टी रॅगींग कमिटीचा सभासद आहे.

१४) एक सभासद लोकल ऑथरायझेशन कमिटी फॉर ऑरगनट्रान्सप्लांट कमिटीचा आहे.

१५) पदवी विद्यार्थ्यांसाठी बायोएथीक्स कार्यक्रम आयोजित करणे.

१६) इम्लीमेटेशन ऑफ प्री-क्लिनिकल एक्सपोजर पदवी विद्यार्थ्यांसाठी आडव्या आणि उभ्या शिक्षणाच्या माध्यमातून व एक्सपोजर टु क्लिनिकल कजेस.

१७) परिषद कार्यशाळा सी.एम.ई. आयोजिक केली अथवा भाग घेतला.

१८) टी.एन.एम.सी. येथे अंतरविद्यालयीन फिजीओलॉजी क्विझचे आयोजन करणे.

## जीवरसायनशास्त्र विभाग

★ विभागाचा पत्ता - ४ था मजला, महाविद्यालय इमारत, टो.रा. वैद्यकिय महाविद्यालय.

★ विभाग - नाही.

★ शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी खालीलप्रमाणे -

| अ.क्र. | शिक्षक कर्मचारी | अ.क्र. | शिक्षकेत्तर कर्मचारी |
|---|---|---|---|
| १. | डॉ. माधवी सु. फडके, प्राध्यापक व विभागप्रमुख | १. | श्री. दि.रा. पाटील, लिपिक |
| २. | डॉ. अलका वि. नेरूरकर, प्राध्यापक | २. | सौ. रूपा रा. दळवी, प्रयोगशाळा तंत्रज्ञ |
| ३. | डॉ. अनुराधा नि. कान्हेरे, प्राध्यापक (अति.) | ३. | सौ. रूपलक्ष्मी तेलंग, प्रयोगशाळा तंत्रज्ञ |

| | | | |
|---|---|---|---|
| ४. | डॉ. निलम ज. पाटील, सह. प्राध्यापक (तदर्थ) | ४. | श्री. मा.भा. वाघ, (सेवक) |
| ५. | डॉ. संचिन अ. पाथरकर, सह. प्राध्यापक (तदर्थ) | ५. | श्री. लालू वि. केकरे, (सेवक) |
| ६. | डॉ. अमित र. बारापात्रे, सहा. प्राध्यापक | ६. | श्री. ग.स. सोलंकी, (सेवक) |
| ७. | डॉ. संजय स्वामी, सहा. प्राध्यापक | ७. | श्री. र.ल. कारेकर (सेवक) |
| ८. | डॉ. मनोज लोखंडे, सहा. प्राध्यापक | | |
| ९. | डॉ. अविनाश जाधव, सहा. प्राध्यापक | | |

**पुरविण्यात येणा-या सेवा -**

एम.यु.एच.एस. अंतर्गत शिकविण्यात येणारे विषय खालील प्रमाणे

| | |
|---|---|
| १) प्रथम वर्ष वैद्यक | १२० विद्यार्थी |
| २) प्रथम वर्ष दंत वैद्यक | ६० विद्यार्थी |
| ३) प्रथम वर्ष भौतिकोपचार | १० विद्यार्थी |
| ४) प्रथम वर्ष व्यवसायोपचार | १० विद्यार्थी |
| ५) वैद्यकिय प्रयोगशाळा तंत्रज्ञ | १० विद्यार्थी |
| ६) प्रथम वर्ष पॅरामेडिकल टेक्निशीयन | १० विद्यार्थी |
| ७) व्दितीय वर्ष पॅरामेडिकल टेक्नीशीयन | |
| ८) पी.एच.डी. मेडिकल बायोकेमिस्ट्री | |

**दैनंदिन शैक्षणिक उपक्रम -**

१) जीवरसायनशास्त्र विभागामार्फत प्रथम वर्ष वैद्यक, प्रथम वर्ष दंत वैद्यक, प्रथम वर्ष भौतिकोपचाार व व्यवसायोपचार आणि प्रथम वर्ष पॅरामेडिकल टेक्नीशियन या विषयांच्या पदवीपूर्व वर्गांकरिता व्याख्याने.

२) पदव्युत्तर वर्गांकरिता शैक्षणिक व्याख्याने- प्रथम व व्दितीय वर्ष एम.एस.सी., वैद्यकिय प्रयोगशाळा तंत्रज्ञ उपक्रम व पदव्युत्तर दंत वैद्यक विद्यार्थ्यांकरिता व्याख्याने.

३) प्रथम वर्ष वैद्यक व प्रथम वर्ष दंत वैद्यक विद्यार्थ्यांकरिता प्रात्यक्षिके व प्रायोगिक शिक्षण आणि प्रथम वर्ष पॅरामेडिकल टेक्नीशियन या विषयाकरिता प्रात्यक्षिक.

४) प्रथम व व्दितीय वर्ष एम.एस.सी., वैद्यकिय प्रयोगशाळा तंत्रज्ञ विद्यार्थ्यांकरिता प्रात्यक्षिके व प्रायोगिक शिक्षण.

५) अंतर्गत चाचणी परीक्षांचे आयोजन, पदवीपूर्व प्रथम वर्ष वैद्यक, प्रथम वर्ष दंत वैद्यक, प्रथम वर्ष भौतिकोपचार व व्यवसायोपचार आणि वैद्यकिय प्रयोगशाळा तंत्रज्ञ विद्यार्थ्यांकरिता.

६) एम.एस.सी. जीवरसायनशास्त्र (संशोधनाव्दारे) तसेच पी.एच.डी. या अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांना त्यांच्या संशोधन कार्यात आणि उपक्रमात मार्गदर्शन केले जाते.

## विकृतीशास्त्र विभाग

प्रस्तावना संस्था, संस्थेची कार्ये

एकूण  शवविच्छेदन २०१५ वर्षे

न्याय वैद्यकशास्त्र संबंधित: ६७३

न्याय वैद्यकशास्त्र संबंधित नसलेले:  ६०२

## सूक्ष्मजीवशास्त्र विभाग

1946 पासून सूक्ष्मजीवशास्त्र विभाग हा “विकृतीशास्त्र आणि जंतूशास्त्र" यांचा एक भाग होता. या विभागाला 1977 पासून स्वतंत्र विभाग म्हणून मान्यता मिळाली. फेब्रुवारी 1977 ते मे 1991 पर्यंत या विभागाची धुरा डॉ. श्रीमती प्रेमा मुर्ती यांनी अतिशय समर्थपणे सांभाळली. त्यांच्या कारकिर्दीत एम्. डी. (सूक्ष्मजीवशास्त्र), एम.एस.सी. (संशोधनपर- सूक्ष्मजीवशास्त्र ऋ व पी.एच.डी. (सूक्ष्मजीवशास्त्र) यासारख्या पदव्युत्तर शाखा प्रथमच चालू करण्यात आल्या. विभागामध्ये उत्तमोत्तम व दर्जेदार उपकरणे आणली गेली उदा. मॉड्युलर फ्लोरसंट फेज कॉन्ट्रास्ट सूक्ष्मदर्शक यंत्र, एलिजा रीडर, अतिशय शीत करणारा डीप फ्रिझर आणि संगणक.

डॉ. व्ही.व्ही. काळे यांनी जून 1991 ते मे 1992 अशा अल्पकालावधीसाठी या विभागाची धुरा प्राध्यापक व विभागप्रमुख म्हणून सांभाळली.

सप्टेंबर 1992 ते नोव्हेंबर 2004 या अवधीत डॉ. सौ. गीता कोप्पीकर यांनी प्राध्यापक व विभागप्रमुख म्हणून या विभागाचे नेतृत्व केले. त्यांच्या अखत्यारीत “प्रादेशिक

एड्स सर्व्हेलन्स केंद्राची स्थापना करण्यात आली आणि आमची प्रयोगशाळा अत्यंत जोखीम असलेल्या "सेंन्टनल सर्व्हेलन्स कार्यामध्ये समाविष्ट झाली "सुधारीत क्षयरोग प्रतिबंध कार्यक्रम (आर.एन.टी.सी.पी.) याच कालावधीत सुरू करण्यात आला.

डॉ. सौ. के. सरस्वथी यांनी आमच्या विभागाची धुरा प्राध्यापक व विभागप्रमुख म्हणून डिसेंबर 2004 ते सप्टेंबर 2006 या कालावधीत सांभाळली. आमच्या विभागाला 2004 सालापासून "ऐच्छिक गुप्त समुपदेशन व चाचणी केंद्रासाठी जास्त जागा उपलब्ध करून दिली गेली. मार्च 2005 पासून सी.डी.4/सी.डी.8 या चाचण्या उपलब्ध केल्या गेल्या.

ऑक्टोबर 2006 पासून आमच्या विभागाचे नेतृत्व प्राध्यापिका डॉ. सौ. जयंश्री शास्त्री समर्थपणे सांभाळत आहेत. डॉ. सौ. शास्त्री यांना पुढे उल्लेख केलेल्या काही गोष्टींमध्ये विशेष रस आहे. - (1) रूग्णालयातील जंतूसंसर्ग प्रतिबंध (2) सूक्ष्मजीवशास्त्राच्या कामामध्ये स्वयंचलन व आधुनिकीकरण (3) अंतर्भूत समुपदेशन व चाचणी केंद्राचे कार्य, (4) बाह्य व अंतर्गत गुणवत्ता नियंत्रण इत्यादी. डॉ. सौ. शास्त्री यांच्या वाकबगार मार्गदर्शन व देखरेखीखाली एप्रिल 2007 साली कस्तुरबा संसर्गजन्य रोगांसाठीच्या रूग्णालयात अत्यंत दर्जेदार अशा "आण्विक रोगनिदान सूचक प्रयोगशाळेचे" अनावरण करण्यात आले. 2010 साली राष्ट्रीय एड्स नियंत्रण संघटनेने (नॅको) या प्रयोगशाळेला "प्रादेशिक एच आय.व्ही. संदर्भ प्रयोगशाळा" म्हणून मान्यता दिली. एच. आय.व्ही. बाधित रूग्णांना सेकंड लाईन एआरटी औषध योजना सुरू करण्यापूर्वी त्यांच्या शरीरातील एचआयव्ही विषाणुंचे प्रमाण शोधणे व नवजात शिशुंमध्ये एचआयव्ही चे निदान लवकरात लवकर करण्यासाठी एचआयव्ही डी.एन.ए.-पी.सी.आर चाचणी देखील चालू केली गेली. डॉ. शास्त्री यांच्या मार्गदर्शनाखाली एचआयव्ही प्रयोगशाळेला एन.ऐ.बी.एल. ऍक्रिडिटेशन प्राप्त झाले, इम्युनोलॉजी लॅबची स्थापना झाली व क्षयरोग रूग्णांसाठी जीन एक्स्पर्ट प्रयोगशाळा कार्यान्वित झाली. राष्ट्रीय एड्स नियंत्रण संघटनेने फेब्रुवारी 2015 मध्ये सूक्ष्मजीवशास्त्र विभागास "प्रादेशिक रिप्रॉडक्टीव्ह ट्रॅक्ट इन्फेक्शन/सेक्युअली ट्रान्समिटेड इन्फेक्शन यांसाठी चाचणी, प्रशिक्षण, संशोधन आणि संशोधन केंद्र" अशी मान्यता दिली. या प्रयोगशाळेच्या माध्यमातून अत्यंत धोकादायक व कमी धोकादायक जीवनशैलीच्या रूग्णांमधील आरटीआय/एसटीआय या आजारांचे निदान आता शक्य झाले

आहे.

**विभागाची कामकाजाची वेळ:**

विभाग काम: सकाळी 9.00 ते संध्याकाळी 4.00 वाजेपर्यंत

अत्यावश्यक सेवा प्रयोगशाळा: संध्याकाळी 4.30 ते सकाळी 8.00 वाजेपर्यंत

विभागातर्फे पुरविल्या जाणा-या सेवा:

- कामाचे सर्व दिवस ओ.पी.डी. व रूग्णालयात भरती केलेल्या रूग्णांचे विविध प्रकारचे नमुने सकाळी 9.00 ते दुपारी 12 वाजेपर्यंत स्विकारले जातात. रूग्णालयाच्या 'जी' बिल्डिंगमध्ये पहिल्या मजल्यावरील अत्यावश्यक /आणिबाणी प्रयोगशाळेमध्ये रूग्णांची अत्यावश्यक सँपल्स संध्याकाळी 4.30 नंतर घेऊन तपासली जातात.
- घेतलेल्या नमुन्यावर विविध चाचण्या, जंतूंचा शोध व ओळख आणि वेगवेगळ्या ॲन्टीबायॉटिक्सचा परिणाम दर्जात्मक पद्धतीनुसार तपासून त्या चाचण्यांचे अहवाल संबंधित कक्षामध्ये रोजच्या रोज रवाना केले जातात. वर्षभरात आमच्या विभागात सर्वसाधारणपणे 2,27,000 नमुन्यावर रुग्णसेवासाठी विविध तपासण्या केल्या जातात. महानगरपालिकेतील रूग्णालयातील रूग्णांवर केल्या जाणा-या सर्व चाचण्या विनामूल्य/ मोफत केल्या जातात.
- शल्यक्रियागार देखरेख, नि र्जंतुकीकरण तपासणी आणि जंतुनाशकांच्या चाचण्या या सर्व सेवा रूग्णालय जंतुसंसर्ग नियंत्रणाच्या अखत्यारीत पुरविल्या जातात.

**पुरविल्या जाणा-या विशेष सेवा:**

- अंतर्भुत समुपदेशन व चाचणी केंद्र: मुंबई जिल्हे एडस् नियंत्रण सस्थेतर्फे चालविले जाते.
- एआरटी औषधोपचार घेत असलेल्या रूग्णांची सी.डी.4 चाचणी मोफत उपलब्ध
- आर.एन.टी.सी.पी. च्या अंतर्गत थुंकीची फुप्फुसांच्या क्षयरोगासाठी तपासणी तसेच एक्स्ट्रा पल्मनरी रूग्णांचे वेगवेगळे नमुनेदेखील तपासले जातात.
- जीन एक्सपर्टच्या सुविधधेमुळे क्षयरोगाची आण्विक निदान पद्धतीने लवकर तपासणी केली जाते.
- रिप्रॉडकटीव्ह ट्रॅक्ट/ सेक्सुअली ट्रान्समिटेड आजारांचे निदान

- मुंबई मधील वेगवेगळया हॉटेल्स, खानावळ्या, रेस्टारन्टस मध्ये अन्न हाताळणी करणा-या व्यक्तींची संसर्गजन्य रोगाच्या प्रादुर्भावासाठी नियमित तपासणी करून त्यांना त्याप्रमाणे प्रमाणित करणे.
- रूग्णालयात होणा-या कोणत्याही जंतुसंसर्गाचा मागोवा घेणे
- तापाने आजारी असणा-या रूग्णांवरील विविध चाचण्या
- काविळीच्या जंतुंचे (विषाणुंचे) सखोल परिक्षण
- आमच्या रूग्णालयात जंतुसंसर्ग नियंत्रण करण्यासाठी तयार केल्या जाणा-या मसुद्यामध्ये सूक्ष्मजीवशास्त्र विभागाचा अत्यंत महत्वपूर्ण सहभाग असतो. तसेच घनकचरा विल्हेवाट व त्याची योग्य प्रकारे अंमलबजावणी करण्यासाठी आमच्या विभागाचा मोलाचा सहभाग आहे.

**शैक्षणिक कार्यभाग:**

आमच्या विभागातील शिक्षकांतर्फे वैद्यकीय, दंतवैद्य, पी.जी.डी.एम.एल.टी. ऑक्युपेशन थेरपी, फिजीओ थेरपी, बी.पी.एम.टी या अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांसाठी लेक्चर्स आणि प्रात्यक्षिके घेतली जातात. तसेच नर्सिंगच्या विद्यार्थ्यांसाठीही लेक्चर्स घेण्यात येतात. सर्वसाधारणपणे दरवर्षी 550 विद्यार्थ्यांना शिकविले जाते.

**पदव्यूत्तर शिक्षण:**

दर आठवड्यातून दोनवेळा पदव्युत्तर विद्यार्थी अभ्यासक्रमातील विविध विषयांवर परिसंवाद आणि जर्नल रिव्हूयू सादर करतात. पदव्युत्तर विद्यार्थी आमच्या तसेच मुंबईतील इतर वैद्यकीय संस्थांमधील व्याख्याने, चर्चासत्र, परिसंवाद, कार्यशाळा यांमध्ये आवर्जुन सहभाग घेतात. विभागातील सर्व वरिष्ठ शिक्षकवर्ग या पदव्युत्तर शिक्षण सत्रांमध्ये सहभाग घेतात व विद्यार्थ्यांना समर्थपणे मार्गदर्शन करतात. आमच्या विभागाला एम.डी. (सूक्ष्मजीवशास्त्र) या पदवीसाठी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिक यांची मान्यता प्राप्त आहे. तसेच एमएससी. व पी.एच.डी. (सूक्ष्मजीवशास्त्र) या अभ्यासक्रमांसाठी मुंबई विद्यापीठाची मान्यता प्राप्त आहे.

अधिकारी व कर्मचारी यांचे अधिकार व जबाबदा-या विभागातील सर्व प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक व सहाय्यक प्राध्यापक वेगवेगळ्या अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांसाठी नियमितपणे व्याख्याने घेतात. सहाय्यक प्राध्यापक व पदव्युत्तर विद्यार्थी वेगवेगळ्या

अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांसाठी ट्यूटोरिअल्स व प्रात्यक्षिके घेतात.

आमच्या विभागातील एक प्राध्यापक व एक सहाय्यक प्राध्यापक विद्यार्थ्यांना शिकविण्या व्यतिरिक्त कस्तुरबा रूग्णालयातील वेगवेगळ्या प्रयोगशाळांमधील कामांवर देखरेख ठेवतात. आमच्या विभागप्रमुख डॉ. शास्त्री देखील कस्तुरबा रूग्णालयातील पी.सी.आर. प्रयोगशाळेत दररोज भेट देऊन तेथील कामावर लक्ष ठेवतात.

विभागातील तंत्रज्ञ, सहाय्यक, हमाल, सेवक प्रयोगशाळेतील सेवाजेष्ठ तंत्रज्ञ अथवा कनिष्ठ संशोधन अधिकारी (ज्युनियर सायंटिफिक अधिकारी) कामाच्या दर्जावर देखरेख ठेवतात. तसेच प्रयोगशाळेतील कामे सुरळीत चालण्यासाठी लागणा-या सर्व साधनसामुग्रीचा पुरवठा नियमित ठेवण्याकडे कसोशीने लक्ष ठेवतात. सेवक व स्वीपर्स प्रयोगशाळांची सफाई, नीट नेटकेपणा, वापरलेल्या वस्तुंचे र्निजंतुकीकरण व सफाई या सर्व गोष्टी करतात. विभागातील क्लार्क कम टायपिस्ट टंकलेखन, डिस्पॅच, रेकॉर्ड किपिंग, फाईलिंग स्टोअर्स आणि विभागप्रमुखांनी सांगितलेली इतर सर्व कामे करतात. विभागातील समुपदेशक एच आय व्ही चाचणीसाठी येणा-या सर्वांचे चाचणी आधी व नंतर समुपदेशन करतात.

**निर्णय घेताना केली जाणारी प्रक्रिया –**

पावसाळ्यामध्ये वेगवेगळ्या चाचण्या रूग्णांच्या रक्तावर कराव्या लागतात. त्या करताना रूग्णाच्या आजाराची अवस्था व संशयित जंतू वा विषाणू यांचा एकत्रित विचार करून योग्य ती चाचणी केली जाते. उदा. ऍंटीजेन डिटेक्शन चाचणी आजाराच्या सुरवातीच्या काळात (सुरूवातीचे ३ ते ५ दिवस) सर्वांत जास्त उपयुक्त ठरते. त्यानंतर ऍन्टीबॉडी डिटेक्शन चाचणीचे अहवाल रोगनिदानासाठी जास्त योग्य ठरतात. (आय.जी.एम. टेस्ट) जास्त कालावधी झाला असल्यास आय.जी.जी. टेस्ट आमच्या विभागाची इन्फेक्शन कंट्रोल कमिटी आमच्या संपूर्ण रूग्णालयाची ऍंटीबायोटिक पॉलिसी तयार करण्यास अत्यंत मोलाचा हातभार लावते.

**कार्यभाग सुरळीतपणे होण्यासाठी ठरवून दिलेली सुत्रेः**

आमच्या विभागातील प्रत्येक उपविभागावर प्राध्यापक/सहयोगी प्राध्यापक/सहाय्यक प्राध्यापक व्यवस्थित देखरेख ठेवतात. विभागप्रमुख संपूर्ण विभागाच्या सर्वसाधारण कामावर देखरेख व नियंत्रण ठेवतात.

सूक्ष्मजीवशास्त्र विभागाचे उपविभाग व त्यांचे रूग्णालयातील स्थान

| | | |
|---|---|---|
| इम्युनॉलॉजी | रूम नं.305 | तिसरा मजला |
| आरटीआय/एसटीआय | रूम नं.305 | तिसरा मजला |
| विषाणु विभाग | रूम नं.303 | तिसरा मजला |
| सिरॉलॉजी | रूम नं.311 E | तिसरा मजला |
| क्षयरोग चिकित्सा | रूम नं.311 F | तिसरा मजला |
| बुरशीजन्य रोग चिकित्सा | रूम नं.311 G | तिसरा मजला |
| आय.सी.टी.सी. | रूम नं.311- I | तिसरा मजला |
| फॅक्स सीडी 4 /सी.डी.8 चाचणी | रूम नं.311-I | तिसरा मजला |
| परजिवी रोग चिकित्सा | रूम नं.313- B | तिसरा मजला |
| जंतुरोग चिकित्सा | रूम नं.313- A | तिसरा मजला |
| इमर्जन्सी प्रयोगशाळा | जी बिल्डींग | पहिला मजला |

**इतर उपयुक्त माहिती:**

- प्रादेशिक रिप्रॉडक्टिव्ह ट्रॅक्ट इन्फेक्शन / सेक्शुअली ट्रान्समिटेड इन्फेक्शन्स यासाठी चाचणी, प्रशिक्षण, संशोधन व संदर्भ केंद्र: फेब्रवारी 2015 पासून
- "संसर्गजन्य आजारांचे आण्विक पद्धतीने निदान" या विषयावर 2 वर्षातून एक वेळा परिषदेचे आयोजन
- "शास्त्रीय शोधनिबंध कसे लिहावें या विषयावर दरवर्षी जानेवारी किंवा फेब्रुवारी महिन्यात कार्यशाळेचे आयोजन

निरनिराळ्या उपविभागांमध्ये रूग्णाचे घेतले जाणारे नमुने व केल्या जाणा-या चाचण्या:

- बॅक्टेरिऑलॉजी- ग्रॅम स्टेनिंग, एअरॉबिक व अनएअरॉबिक पद्धतीने जंतूंची प्रयोगशाळेत वाढ करणे व त्यांच्यावर ॲन्टिबायो्टिक्सचा होणारा परिणाम यांची नोंद करणे.

(i) रूस्पिरेटरी सॅम्पल्स- थुंकी, एंडोट्रॅकिअल ॲस्पिरेट, घशाचा स्वॅब

(ii) मेंदूतील पाणी, पेरिटोनिअल फ्युईड, प्लुरल फ्लुईड

(iii) लघवी, विष्ठा, रक्त (कनव्हेंशनल व बॅकटेक)

(iv) क्लॉट कल्चर

(v) इतर नमुने: पू, जखमेचा स्वॅब, टिश्यू

- रूग्णालय संसर्ग नियंत्रण-

(अ) जंतुनाशकांची स्टरिलिटी चाचणी

(ब) शल्यचिकित्सागार देखरेख

(क) अचानक पसरणा-या आजारांवर लक्ष ठेवणे

- परजिवी विभाग-

  (अ) मानवी विष्ठेची सूक्ष्मदर्शकाखाली तपासणी: बाह्यरूग्ण कक्षातील भरती असलेले रूग्ण, अन्न हाताळणा-या व्यक्ती.

  (ब) लिशमॅनिया कल्चर

  (क) संधीसाधू परजिवींचे रोगनिदान, क्रिप्टोस्पोरिडिअम, आयझोस्पोरा स्पेशल स्टेनिंगचा वापर करणे.

- क्षयरोग चिकित्सा-

(अ) क्षयरोगी व्यक्तींची थुंकी तपासणे

(ब) इतर क्षयरोगी रूग्णांचे योग्य ते नमुने तपासणे

(क) क्षयरोग जंतूंची प्रयोगशाळेत वाढ करणे

(ड) जुलै 2015 पासून "जीन एक्स्पर्ट टेस्ट सुरू केली

- सिरॉलॉजी-

(1) रॅपिड डेंग्यू आयजीएम/आयजीजी

(2) रॅपिड आयजीएम, लेप्टोस्पायरॉसिस

(3) रॅपिड मलेरिया ऍन्टीजेन डिटेक्शन

(4) व्ही.डी. आर.एल.

(5) विडाल

(6) आर.ए.

(7) ए.एस.ओ.

(8) रॅपिड एच आय व्ही ऍन्टीबॉडी टेस्ट

(9) रॅपिड एचबीएसएजी टेस्ट

(10) रॅपिड ॲन्टी एच सी व्ही टेस्ट

- एचआयव्ही-

एच आय व्ही समुपदेशन आणि टेस्टिंग

सी.डी.-4 टेस्टिंग

- बुरशीजन्य रोग

(1) के.ओ.एच. तपासणी

(2) फंगल कल्चर: रक्त, पू, स्त्राव यांमधून

(3) स्पेशल स्टेनिंग: न्यूमोसिस्टिस कॅरिनी

- इम्युनॉलॉजी
  - ★ डेंग्यू एनएस-1 ॲन्टीजेन एलिजा
  - ★ डेंग्यू आय जी एम एलिजा
  - ★ लेप्टो आय जी एम एलिजा
  - ★ एच ए व्ही आय जी एम एलिजा
  - ★ एच इ व्ही आय जी एम एलिजा
  - ★ चिक आय जी एम एलिजा

## औषधशास्त्र विभाग

महाविद्यालय इमारत, २रा मजला येथे स्थित असलेल्या औषधशास्त्र विभागात पुढील गोष्टी कार्यान्वित आहेत.

पदवीपूर्व व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना औषधशास्त्र हा विषय शिकवला जातो. तसेच वैद्यक व प्राणी यांचे शोध निबंध केले जातात. संस्थेचा किरणोत्सर्गी अणुशक्ती विभाग औषधशास्त्र विभागाच्या प्रशासनाखाली राबविला जातो. तेथून पुढील रूग्णसेवा दिल्या जातात.

थायरॉईड, हाडे, मुत्रपिंड इत्यादींचे किरणोत्सर्ग स्कॅन केले जातात. व आवश्यकतेनुसार किरणोत्सर्गी आयोडीनची मात्रा रूग्णाला दिली जाते.

सध्या विभागात १ प्राध्यायपक आणि विभाग प्रमुख, २ अति. प्राध्यापक, २ सह

प्राध्यापक व २ सहयोगी प्राध्यापक असा शिक्षक वर्ग आहे. शिक्षकेत्तर कर्मचा-यांमध्ये अर्धवेळ लिपिक व टंकलेखक, नोंदणी सहाय्यक, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, प्रयोगशाळा परिचर व सेवक यांचा समावेश आहे.

किरणोत्सर्ग अणुशक्ती विभागामध्ये वरिष्ठ वैज्ञानिक अधिकारी, कनिष्ठ वैज्ञानिक अधिकारी, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, प्रयोगशाळा परिचर व सेवक हा कर्मचारी वर्ग आहे व अति. प्राध्यापकांच्या अध्यक्षतेखाली हा विभाग चालवला जातो.

विभाग प्रमुख कर्मचा-यांना शैक्षणिक, संशोधन, रूग्णसेवा व प्रशासकिय कामे नेमूण देतात. या व्यतिरिक्त आमचे कर्मचारी सदस्य संस्थेच्या इथिक्स कमिटी, वेबसाईट कमिटी, मेडिकल एज्युकेशन टिचिंग टेक्नॉलॉजी, रिसर्च सोसायटी, स्टुडंट जिमखाना इत्यादींचे कामकाज पाहतात.

वरील कामकाजाची आखणी करण्यासाठी कर्मचा-यांची वेळोवेळी सभा घेतली जाते आणि त्याप्रमाणे शिक्षण कामाकाजाची वेळापत्रके बनवली जातात. योग्य व्यवहार्यता व सुविधा पाहुन शोधनिबंधांचे कार्य केले जाते.

औषधशास्त्र विभागाची जबाबदारी पूर्णत: विभाग प्रमुखांवर आहे. व डॉ. भैरवी भट या किरणोत्सर्गी अणुशक्ती विभागाच्या अधिकारी आहेत. शैक्षणिक अभ्यासक्राची पूर्तता करण्यासाठी शिक्षकांना विविध अभ्यासक्रामांचे जेस एम.डी., एम.बी.बी.एस., बी.डी.एस., ओ.टी., पी.टी., नर्सिंग इत्यादींचे अध्यक्ष केलेले आहे.

विद्यापिठाने मान्य केलेल्या अभ्सासक्रमाप्रमाणे शैक्षणिक कार्य केले जाते.

किरणोत्सर्गी अणुशक्ती विभागातर्फे देण्यात येणा-या रूग्णसेवेची माहिती संस्थेच्या संकेतरस्थळावर www.tnmcnair.com येथे उपलब्ध आहे.

## न्यायवैद्यक शास्त्र विभाग

## टो रा वै महाविद्यालय व बा य ल नायर रुग्णालय

न्यायवैद्यकशास्त्र विभाग प्रामुख्याने खालील प्रमाणे कर्तव्य पार पाडीत आहे.

**१.) अभ्यासा अंतर्गत कर्तव्ये :-**

क) पदवीपूर्व वैद्यकीय शिक्षण:-

न्यायवैद्यक शास्त्र हा विषय एम बी बी एस द्वितीय वर्ष अभ्यास क्रमांतर्गत एक अपरिहार्य विषय असून तो तीन सत्रामध्ये शिकविला जातो.

ख) पदव्युतर वैद्यकीय शिक्षण:- सदर विभागातील एम डी आणि डिप्लोमा (न्यायवैद्यक शास्त्र) ह्या पदव्यांना मेडिकल कॉन्सि ल ऑफ इंडिया ह्या संस्थेकडून मान्यता मिळाल्या आहेत.

**३. न्यायवैद्यकीय कर्तव्ये:-**

अ) सदर विभाग जे लोक अचानक, अनपेक्षितपणे, अनैसर्गिकरित्या किंवा काही संशयास्पद परिस्थितीत आमच्या रुग्णालयात किंवा आग्रीपाडा, ताडदेव, मुंबई सेन्ट्रल रेल्वे , वरळी व ना म जोशी मार्ग ह्या पोलिस ठाण्याच्या हद्दीत मरण पावतात अशा लोकांच्या मृतदेहावर शवविच्शेदन केले जाते.

ब) या विभागात काम करणारे अधिकारी यांनी वेळोवेळी घटनास्थळी भेट देवून तपासी अधिकाऱ्याला तपासास आवश्यक असणारी मुद्देसुद माहिती पुरवली आहे. व तसेच तपासास आवश्यक असणाऱ्या परिस्थितीजन्य पुरावे गोळा करण्यास मदत केली आहे.

क) या विभागात काम करणाऱ्या अधिकाऱ्यांनी वेळोवेळी अतिशय महत्वाच्या अश्या हत्या आणि वाहन अपघाताच्या केसेस मध्ये न्यायालयात साक्ष देवून न्याय यंत्रणेला मदत केले आहे.

ड) सदर विभागामार्फत वेगवेगळ्या न्यायालयातून, पोलिस ठाण्यातून,गैरसरकारी संस्था यांनी संदर्भित केलेल्या व्यक्तिंच्या वयोमर्यादा निश्चित करणे, लैगिक अत्याचार, शरीरावरील जखमा इ. तपासन्या करण्यात येतात.

**इतर कर्तव्ये:-**

अ) MCPC या संस्थेच्या या गठित करण्यात आलेल्या चमूचे न्यायवैद्यक शास्त्र हे एक अविभाज्य अंग आहे.

ब) तसेच हा विभाग गैरसरकारी संस्थांनी पाठविलेले बेवारस मुले तसेच महानगरपालिकेचे कर्मचारी वर्ग यांची वयोमर्यादा / वयोनिश्चिती करण्याचे कर्तव्य पार पाडते.

**सर्वसाधारण शल्यचिकित्सा विभाग**

**बा. य. ल. नायर रुग्णालय व टो. रा. वै. धर्मा.महाविदयालय**

बा. य. ल. धर्मा. रुग्णलयातील सर्वसाधारण शल्यचिकित्सा विभाग रुग्णाना सेवा देणारे मोठे विभाग आहे. या विभागातून पदवीपूर्व तसेच पदवीत्तोर विदयार्थ्याना शैक्षणिक मार्गदशन दिले जाते.

विभागाचे कार्यक्षेत्र दोन प्रकारे विभागले जावू शकते.

१. रुग्ण सेवा – बाहय रुग्ण विभाग

आंतररुग्ण विभाग

अपघात विभाग

शस्त्रक्रिया विभाग

२. शैक्षणिक कार्य – पदवीपूर्व तसेच पदवीत्तोर विदयार्थ्याना लेक्चर टयुटोरियल तसेच डेमोस्टेशन या माध्यामातून प्रशिक्षण दिवून वेळोवेळी परीक्षा घेवून विदयार्थ्याच्या प्रगतीचे मूल्यमापन केले जाते.

विदयार्थाना वार्ड सर्जिकल क्लिानिक बाबत मार्गदर्शन दिले जाते.

बाहयरुग्ण विभागात ही मार्गदशन दिले जाते.

आपरेशन थिअटर मध्ये शिकवले जाते.

विभागाचे प्रमुख डॉ. मीनू संजाना आहेत. विभागाचे कार्य सहा युनिटमध्ये विभाजन केले आहे. ही कार्यप्रणाली सर्वत्र प्रचलित आहे.

रुग्णला सर्वप्रथम निवासी डॉक्टराकडून तपासले जाते. विभागातील प्रोटोकॉल प्रमाणे वरिष्ठासोबत संवाद साधण्याची व निर्णय घेण्याची प्रकिया होत असले.

विभागात खालील विशिष्टच्या सेवाही पुरवल्या जातात, त्या खालील प्रमाणे आहेत.

**Endocrine** सर्जरी – ही विशिष्ट शल्यप्रणाली म्हणून ओळखली जाते. डॉ. मीनू सेजाना

यांच्या नियंत्राणाखाली तसेच इंडोक्राईम विभागाच्या सहयोगाने ही सेवा पुरवली जाते.

Breast सर्जरी - डॉ. जयश्री पंडया,प्राध्यापक मार्फत **स्तन कन्सर चिकित्सा** बाहयरुग्ण विभाग दर बुधवारी दुपारी १२.३० ते ३.०० या वेळेत चालवलेले जाते. तसेच विविध प्रकारचे कॅम्प द्वारे जनसामान्यामधे स्तनाचे विकार ,त्याचे निदान व उपचार या बददल माहिती पुरवली जाते.

**Podiatrics:-** मुबंई शहरात मधुमेहाचा वाढता प्रादुभाव लक्षात घेता पायाचे विकार लक्षात घेता पायाच्या विकारासाठी खास बाहयरुग्ण विभाग चालवला जातो. डॉ. तिलकदास शेटटी यांच्या नियंत्राणाखाली ही सेवा राबवली जाते.

**GESS:** जठरांत्र मार्गाच्या रोगासाठी विशेष बाहयरुग्ण विभाग प्रत्येक मंगळवारी दुपारी १ ते २ च्या दरम्यान डॉ. राजीव जोशी , प्राध्यापक यांच्या मार्फत जात आहे.

**Surgical Endoscopy:** अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून जठरांत्र मार्गाच्या विकाराचे निदान आणि उपचार आज शक्य झाले आहे. ही सेवा या विभागामार्फत पुरवली जाते.

**Laparoscopy:** ही आजची अतत्य प्रगत असे तंत्रज्ञान आहे. या द्वारे रुग्णावर सूक्ष्म छेद्र करून सर्वप्रकारच्या शस्त्रक्रिया करणे शक्य झाल्या आहेत ही सेवा रुग्णांना दिली जाते.

**Hyperbaric Oxygen Therapy Unit:**

कस्तुरबा रुग्णालय येथे असलेले अतिदाब प्राणवायू उपचार केद्र या विभागाद्वारे चालवले जाते. गेली तीस वर्ष फक्त नायर रुग्णालयातीलच नव्हे तर मुंबईतील सर्व रुग्णाना ही सेवा उपलब्ध आहे.

विभागाचे प्रशासन सहजतेने व सुरळीतपणे चालण्याकरिता विभागात अनेक समित्या नेमल्या आहेत.

| सदस्य | सदस्य |
|---|---|
| • **पदवीपूर्व शिक्षण** | डॉ राजेश माहे |
| • **पदवीत्तोर शिक्षण** | डॉ. तिलकदास शेटटी |
| • **बी डी एस** | डॉ स्मुति घेटला, डॉ अस्मा खालिफे |

| | |
|---|---|
| • **. ओटी पी टी** | डॉ. तिलकदास शेटटी, डॉ सुदात्ता वाघमारे |
| • **नर्सिंग विदयाथी** | डॉ सुदात्ता वाघमारे डॉ अस्मा खालिफे |
| • **इनटरशिप** | डॉ राजेश पाटील |
| • **मेन ओटी इक्वीपमेंट बाबत** | डॉ राजीव जोशी , डॉ धर्मेश बलसारकर , डॉ. तिलकदास शेटटी |
| • **टोमा वार्ड व टोमा ओटी** | डॉ जयश्री पंडया डॉ राजेश पाटील |
| • **मायनरओटी व सेप्टीक ओटी** | डॉ राजेश माहे |
| • **अतिदाब प्राणवायू उपचार** | डॉ अनिरुदध चाफेकर ,डॉ सुदात्ता वाघमारे |
| • **लॉप्रोरोस्कोपी इक्वीपमेंट बाबत** | डॉ अनिरुदध चाफेकर , डॉ अस्मा खालिफे |
| • **इंडोस्कोपी इक्वीपमेंट बाबत** | डॉ धर्मेश बलसारकर डॉ अनिरुदध चाफेकर |
| • **डी डी एफ** | डॉ मीनू संजाना , डॉ राजीव जोशी, डॉ जयश्री पंडया |

रुग्णालयातील इतर समिती सोबत शल्यचिकित्सा विभागातील सदस्य काम करीत आहेत .जसे थिअटेर समिती –

१) Dean

२) Dy. Dean

३) Ag. Asst. Dean

४) A.E.(M&E.)

५) Matron

६) Theatre Superintendent

७) Sister I/C Trauma ward

८) Sister I/C Main O.T

९) Sister I/C Minor O.T

१०) Jt. Chief P.O.

११) HOD CVTS

१२) HOD Neurosurgery

१३) HOD Paediatric Surgery

१४) HOD Plastic Surgery

१५) HOD Urology

१६) HOD Obs. & Gynaec

१७) HOD Orthopaedics

१८) HOD of ENT

१९) HOD of Ophthalmology

२०) HOD of Anaesthesiology

२१) HOD of Microbiology

२२) HOD of Radiology

२३) I/C Radiation Therapy

२४) Dr. R.M.Joshi I/C NOT

२५) Dr. J.S.Pandya I/C Tr. O.T

२६) Dr. Rajesh Mahey I/C Minor O.T

२७) Dr. M. K. Sanjana HOD General Surgery

## पदवीपूर्व समिती

Convener

Dr. M.K. Sanjana, Professor & Head of Department General Surgery

Members

Dr. D.J. Asgaonkar, Professor & Head of Department Medicine

Dr. S. Bavdekar, Professor & Head of Department Paediatrics

Dr. Radha Ghidiyal, Professor

Dr. A.R. Dalal, Professor & Head of Department Obst. & Gyn

Dr. S. Shirodkar, Professor Obst. & Gyn

Dr. Ching Ling Yi, Assoc. Professor

Dr. A.N. Parikh, Professor & Head of Department Orthopaedics

Dr. Jayesh Baviskar, Asstt. Professor

## अस्थिव्यंगोपचारशास्त्र विभाग

टो.रा. वैद्यकीय महाविद्यालय आणि बा.य.ल. नायर धर्मा. रूग्णालय

**विभागाचा इतिहास -**

टोपीवाला राष्ट्रीय वैद्यकिय महाविद्यालय आणि बाई यमुनाबाई लक्ष्मणराव नायर धर्मादाय रूग्णालयाच्या अस्थिव्यंगोपचारशास्त्र विभागाचा इतिहास ५० वर्षाहुनही जुना आहे. डॉ. के.एस. मसालावाला हया विभागाचे पहिले विभाग प्रमुख होते. त्यांची जे.जे. रूग्ण्यालयामध्ये बदली झाल्यानंतर डॉ. एम.व्ही. सावंत यांनी विभागाची सुत्रे हाती घेतली. भौतिकोपचार आणि पुर्नवसनशास्त्र या विषयामध्ये त्यांची प्रमुख आवड होती. त्यानंतर डॉ. के.व्ही. चौबल हे पुढील विभागप्रमुख झाले व त्यांनी विभागामध्ये दोन युनिट निर्माण केले. डॉ. सी.ए. तळवळकर हे दुस-या युनिटचे प्रमुख होते. डॉ. के.व्ही. चौबल हयांच्या सेवानिवृत्तीनंतर डॉ. सी.ए. तळवळकर विभाग प्रमुख झाले आणि रूग्णालयात पूर्णवेळ तत्वावर विभागात तीन युनिट सुरू झाले. सध्या तीन पूर्णवेळ प्राध्यापक तीन युनिटचा कारभार चालवत आहेत. सध्या विभागात डॉ. असीम निरंजन पारेख विभाग प्रमुख आहेत. विभागात २ प्राध्यापक, २ अतिरिक्त प्राध्यापक, १ अतिरिक्त सहयोगी प्राध्यापक, २ सहाय्यक प्राध्यापक, ९ निवासी डॉक्टर पूर्णवेळ कार्यरत आहेत.

**पुरविण्यात येणा-या सेवा -**

अस्थिव्यंगोपचारशास्त्र विभागात सर्व प्रकारच्या विशेष सुविधांचे आणि उपचाराच्या सेवा पुरविल्या जातात. उत्कृष्ट साधनांनी सुसज्ज असलेले तीन शस्त्रक्रियागार आहेत व खालील शस्त्रक्रिया नियमितपणे केल्या जातात.

१) सर्व प्रकारच्या अस्थिव्यंग अपघात शस्त्रक्रिया
२) अपघाती मणक्याच्या शस्त्रक्रिया
३) सांधेप्रत्यारोपणाच्या शस्त्रक्रिया
४) दुर्बिणीव्दारे (ऑर्थोस्कोपी) गुडघ्याच्या व खादयांच्या शस्त्रक्रिया
५) अस्थिव्यंगदोष दुरूस्ती शस्त्रक्रिया
६) मणक्याच्या वैकल्पिक शस्त्रक्रिया

**अध्यापक -**

| | |
|---|---|
| १) डॉ. असीम पारेख | प्राध्यापक व विभाग प्रमुख |
| २) डॉ. नौशाद हुसेन | प्राध्यापक |
| ३) डॉ. आशिष अगरवाल | अतिरिक्त प्राध्यापक |
| ४) डॉ. प्रशांत गेडाम | अतिरिक्त प्राध्यापक |
| ५) डॉ. कुमारस्वामी दुस्सा | अतिरिक्त सहयोगी प्राध्यापक |
| ६) डॉ. जयेश बावीसकर | सहाय्यक प्राध्यापक |
| ७) डॉ. राजेंद्र फुंदे | सहाय्यक प्राध्यापक |

**विभागातील कामकाज -**

**बाहयरूग्ण विभाग -**

दिवस - सोमवार ते शनिवार सकाळी ०८.०० ते दुपारी १२.०० वाजेपर्यंत
स्थळ - ओ.पी.डी. क्र. १८, तळमजला, ओ.पी.डी. इमारत.

**आंतररूग्ण विभाग -**

महिलांसाठी कक्ष क्र. ०३, पुरूषांसाठी कक्ष क्र. ०८
स्थळ - ओ.पी.डी. इमारत, ६ वा मजला.

**शस्त्रक्रिया विभाग -**

- सोमवार ते शनिवार कार्यरत अपघाती शस्त्रक्रिया सर्व दिवस २४ तास चालू (२४X७)
स्थळ - अस्थिव्यंगोपचार शस्त्रक्रिया कक्ष, ५ वा मजला, ओ.पी.डी. इमारत.

विभागाचा दुरध्वनी क्रमांक (०२२) - २३०२७६०६
विभागाचा ई-मेल आयडी nairorthopaedics@gmail.com

**शैक्षणिक उपक्रम -**

अस्थिव्यंगोपचारशास्त्र विभागातील रूग्णांना भेटून त्यांची चौकशी करणे, विद्यार्थ्यांना शिकवणे, सादरीकरण करणे, प्रकाशन इत्यादी.

**उपक्रम -**

१) क्लिनिकल मिटिंग्स

२) कार्यशाळा

**भविष्यातील नियोजन आणि विकास -**

गुडघेसांधा बदलीबाबत आम्ही आधुनिक संगणकाच्या सहाय्याने शस्त्रक्रियेचे नियोजन सुरू करणार आहोत. एल.ई.डी. प्रकाश आणि शस्त्रक्रिया टेबलासाठी भुषणावह असणारे आर्थोस्कोपीक शस्त्रक्रियेचे एन्डोस्कोप संच बसविण्याची प्रक्रिया कार्यान्वित करीत आहोत.

## स्त्रीरोग व प्रसुतीशास्त्र विभाग

**या विभागातील प्रगतीनिर्देशक कार्ये**

- मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयांपैकी स्वतंत्र बाह्यरूग्ण विभाग उपलब्ध आहे.
- मुंबई प्रसुतिशास्त्र आणि स्त्रीरोगशास्त्र संस्थेप्रमाणे या विभागात पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी नियमित प्रशिक्षण अभ्यासक्रम चालविले जातात.
- महानगरपालिकेच्या अद्ययावत रुग्णालयांपैकी फन्क्शनल ऑपरेटिव्ह एन्डोस्कोपी युनिट अथक प्रयत्नाने या विभागात सुरु करण्यात आले आहे. रुग्णांस एल. ए. व्हि. एच. सारखी सुविधा पुरविले जाते.

## बालरोगचिकित्साशास्त्र विभाग

**प्रस्तावना –**

बालरोगचिकित्साशास्त्र विभागाची स्थापना सप्टेंबर १९४८ झाली. या विभागाद्वारे नवजातशिशू आणि बालकांना सर्वसाधारण बाहयरुग्ण विभाग व विशेष बाहयरुग्णविभाग, बालरोगचिकित्सा कक्ष, बालरोग अतिदक्षता विभाग व नवजातशिशू अतिदक्षता विभाग इतर अत्यावश्यक सेवांद्वारे आरोग्य सेवा पुरविल्या जातात. बालरोग विभाग मनोरुग्णविभागाशी समन्वय साधून स्वमग्नता व शैक्षणिक अक्षमता असलेल्या बालकांच्या सेवेस कार्यरत आहे.

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विदयापीठाच्या मान्यतेने पदवी व पद्व्युत्तर विदयार्थ्यांसाठी विविध शैक्षणिक उपक्रम आणि फेलोशिप प्रशिक्षण कार्यक्रम हया विभागाव्दारे राबविले जातात. बालरोगशास्त्र विभाग परिचारिका , फीजीओथेरपी, ॲक्युपेशनल थेरपी ऑडिओलॉजी व स्पीचथेरपी यांच्या संयुक्त विदयमानाने या अभ्यासक्रमाच्या नोंदणीकृत विदयार्थ्यांना प्रशिक्षण देते.

अध्यापक व विदयार्थी विविध संशोधनात कार्यरत आहेत.

**संस्थेचा तपशील, कार्ये व कर्तव्ये –**

अध्यापक वर्ग

| अ.क्र | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | डॉ. सन्दीप बावडेकर | प्राध्यापक व विभागप्रमुख |
| २ | डॉ. राधा घिल्डियाल | प्राध्यापक |
| ३ | डॉ. सुषमा मलिक | प्राध्यापक |
| ४ | डॉ. सुरभि राठी | प्राध्यापक |
| ५ | डॉ. सुषमा सावे | सहयोगी प्राध्यापक |
| ६ | डॉ. पुनम वाडे | सहयोगी प्राध्यापक |
| ७ | डॉ. संतोष कोंडेकर | सहयोगी प्राध्यापक |
| ८ | डॉ. अल्पना कोंडेकर | सहयोगी प्राध्यापक |
| ९ | डॉ. सुनिल जोंधळे | सहाय्यक प्राध्यापक |
| १० | डॉ. वरुण आनंद | सहाय्यक प्राध्यापक |

११ डॉ. निलिमा नारखेडे सहाय्यक प्राध्यापक

१२ डॉ. विनया लिचडे सहाय्यक प्राध्यापक

**ठिकाण -**

१. कार्यालय - टो.रा. वैदयकीय महाविदयालय इमारत, १ ला मजला.

२. बालरोग कक्ष - कक्ष क्र १५, रुग्णालय इमारत , पाचवा मजला.

३. बालरोग अतिदक्षता कक्ष - रुग्णालय इमारत , पाचवा मजला

४. बालरोग बाहयरोग विभाग- ओ.पी.डी नं-९, पहिला मजला, बाहयरोग विभाग इमारत

५. नवजातशिशू अतिदक्षता विभाग - बाहयरोग विभाग इमारत, तिसरा मजला.

**विभाग /कक्षा / शाखा**

विभागातील सुविधा -

एकुण खाटांची संख्या - १२१

विभागातील युनिट्स ची संख्या - ३

| | |
|---|---|
| उपलब्ध असलेल्या एकूण खाटांचे वितरण | १२१ खाटा<br>युनिट १- ४१ खाटा (३० सर्वसाधारण कक्ष + ६ बालरोग अतिदक्षता कक्ष + ५ नवजातशिशू अतिदक्षता कक्ष.<br>युनिट २ - ४० खाटा (३० सर्वसाधारण कक्ष +१० नवजातशिशू अतिदक्षता कक्ष. )<br>युनिट ३ - ४० खाटा (३० सर्वसाधारण कक्ष +१० नवजातशिशू अतिदक्षता कक्ष. ) |

**अध्यापक वर्गाची युनिटप्रमाणे व्यवस्था**

| हुद्दा | युनिट १ | युनिट २ | युनिट ३ | नवजातशिशू अतिदक्षता विभाग |
|---|---|---|---|---|
| प्राध्यापक व विभागप्रमुख | डॉ. सन्दीप बावडेकर | डॉ. राधा घिल्डियाल | डॉ. सुरभि राठी | डॉ.सुषमा मलिक |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| सहयोगी प्राध्यापक | डॉ. सुषमा सावे | डॉ. अल्पना कोंडेकर | डॉ. संतोष कोंडेकर | डॉ. पुनम वाडे |
| सहाय्यक प्राध्यापक | डॉ. सुनिल जोंधळे | डॉ. वरुण आनंद | डॉ. निलिमा नारखेडे | डॉ. विनया लिचडे |

**बालरोगविभागामार्फत देण्यात येणा-या सेवा -**

अत्यावश्यक सेवा

अतिदक्षता सेवा ( बालरोग आणि नवजातशिशू अतिदक्षता कक्ष)

सर्वसाधारण नवजात आंतररुग्ण व बाह्यरुग्णसेवा

सर्वसाधारण बालरोग बाह्यरुग्णसेवा

बालरोग मज्जातंतू विकार व अपस्मार रुग्ण सेवा

अत्यावस्थ नवजात शिशू पाठपुरावा विभाग सेवा

बालदमा व छातीचे विकार

मुत्रपिंड विकार व संधीवात

ॲन्टी रेट्रोव्हायरल थेरपी

बालजठरांत्रिक रोग

**सहयोग**

| सहयोगी विभाग | सेवा |
|---|---|
| सामाजिक वैदयकशास्त्र विभाग | शालेयचिकित्सा आरोग्य सेवा<br>प्राथमिक नागरी आरोग्य सेवा |
| मानसोपचार विभाग | शैक्षणिक अक्षमता केंद्र<br>स्वमग्नता |
| श्रवणशास्त्र व वाकविकृती विभाग | नवजात शिशूंची श्रवणचाचणी व वाचा उपचार केंद्र |
| इतर | आरोग्य शिबिर व इतर समाजविकास सेवा यांमध्ये सहभाग |

**कर्तव्ये-**

**१. वैदयकीय -**

सर्वसाधारण व विशेष बालरोग बाहयरुग्ण विभागातील रुग्णांसाठी नित्यनियमीत व अत्यावश्यक सेवा दिल्या जातात, तसेच दाखल झालेल्या रुग्णांना सर्वसाधारण बालरोग कक्ष व बालरोग अतिदक्षता कक्षेत वैदयकीय सेवा पुरविल्या जातात.

रुग्णालयात जन्म झालेल्या व नवजातशिशू अतिदक्षता विभागात दाखल झालेल्या रुग्णांना रुग्णसेवा पुरविण्यात येते.

**२. शैक्षणिक आणि प्रशिक्षण**

**वैदयकीय विदयार्थी आणि आंतरवासीता (इनर्टन्स)**

| | |
|---|---|
| पदवीपूर्व वैदयकीय विदयार्थी | नित्याचे शैक्षणिक उपक्रम |
| आंतरवासीता (इनर्टन्स) | बालकांचे आजार व आकस्मित सेवा यांबद्दल अभिमुख केले जाते.<br>नवजातशिशू व बालचिकित्सा प्रशिक्षण<br>नवजातशिशू व बालकांचे आजार यावरील एकीकृत व्यवथापन.<br>नवजात संजीवनी (रिससिटेशन) कार्यक्रम |
| पदविका, पद्व्युत्तर (बालरोगचिकित्साशास्त्र) (MD Pediatrics) , डिप्लोमा इन चाईल्ड हेल्थ (DCH) तसेच फेलोशिप अभ्यासक्रमाकरिता नोंदणीकृत विदयार्थी | विदयाशाखेतील प्राध्यापकांचे नियमित व्याख्यान, आमंत्रित तज्ञ डॉक्टरांचे व्याख्यान, संशोधनासाठी मार्गदर्शन, रुग्णासमीप प्रात्यक्षिके, रुग्णनिदान व इलाज यावरील दैनिक मार्गदर्शन व चर्चा हयासर्व उपक्रमांचा समावेश आहे. चर्चासत्रे, सेमिनार, जर्नल क्लब यांचे आयोजन करण्यात येते. कार्यशाळा व प्रशिक्षणांचे आयोजन केले जाते. (जसे स्तनपान, लॅक्टेशन मॅनेजमेंट ॲन्ड इनफन्ट एन्ड यंग चाईल्ड न्युट्रिशन, नवजात संजीवनी ((रिससिटेशन)) कार्यक्रम, बाल संजीवनी ((रिससिटेशन)) कार्यक्रम, जलसंजीवनी चिकित्सा. मूलभूत संशोधनपध्दती. |

इतर

| | |
|---|---|
| परिचारिका विदयार्थी | स्तनपान, लॅक्टेशन मॅनेजमेंट ॲन्ड इनफन्ट एन्ड यंग चाईल्ड न्युट्रिशन, नवजात संजीवनी ((रिससिटेशन)) कार्यक्रम इत्यादींवरील आयोजित व्याख्यान, प्रशिक्षण, कार्यशाळेत सहभाग. |
| व्यावसायोपचार शाखेतील नोंदणीकृत पदवीधर विदयार्थी | आयोजित व्याख्यानातील सहभाग |
| भौतिकोपचार शाखेतील नोंदणीकृत पदवीधर विदयार्थी | आयोजित व्याख्यानातील सहभाग. |

३. संशोधने व प्रकाशने

विभागादवारे आयोजित संशोधन कार्यक्रमात सहभाग. (पद्व्युत्तर विदयार्थ्यांकरिता विदयापीठाने बंधनकारक केलेल्या प्रबंधाचे सादरीकरण)

प्राध्यापक व विदयार्थी त्यांचे संशोधन व वैदयकीय शास्त्रीय प्रपत्र व पुस्तके यांत प्रकाशित केले जाते.

१५. **वेळापत्रक**

सर्वसाधारण बाहयरुग्ण विभाग - सकाळी ८.०० ते सकाळी ११.००
(सोमवार ते शनिवार)

विशेष बाहयरुग्ण विभाग - दुपारी १.३० ते ३.३० (सोमवार ते गुरुवार)

आंतररुग्ण व अत्यावश्यक सेवा - २४ तास

बालरोगचिकित्साशास्त्र विभागीय कार्यालय - सकाळी ९.०० ते दुपारी ४.००
(सोमवार ते शुक्रवार) सकाळी ९.०० ते दुपारी १.०० (शनिवार)

**१७. उपलब्ध सेवांचा तपशील**

| अ.क्र | बाहयरुग्ण विभाग | दिवस | वेळ | ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | सर्वसाधारण बालरुग्ण बाहयरुग्ण विभाग | (सोमवार ते शनिवार) | सकाळी ८.०० ते सकाळी ११.०० | ओ.पी.डी नं ९, १ ला मजला. ओ.पी.डी इमारत. |
| २ | वेल बेबी क्लिनिक | बुधवार, शुक्रवार | सकाळी १०.०० ते दुपारी १२.३० | ओ.पी.डी नं ९, १ ला मजला. ओ.पी.डी |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | इमारत. |
| ३ | बालरोग मज्जातंतू विकार व अपस्मार प्रतिबंधक सेवा | सोमवार | दुपारी १.३० ते दुपारी ३.३० | ओ.पी.डी नं ९, १ ला मजला. ओ.पी.डी इमारत. |
| ४ | अत्यावस्थ नवजात शिशू पाठपुरावा विभाग सेवा | मंगळवार | दुपारी १.३० ते दुपारी ३.३० | ओ.पी.डी नं ९, १ ला मजला. ओ.पी.डी इमारत. |
| ५ | बालदमा व छातीचे विकार | बुधवार | दुपारी १.३० ते दुपारी ३.३० | ओ.पी.डी नं ९, १ ला मजला. ओ.पी.डी इमारत. |
| ६ | मुत्रपिंड विकार व संधीवात | गुरुवार | दुपारी १.३० ते दुपारी ३.३० | ओ.पी.डी नं ९, १ ला मजला. ओ.पी.डी इमारत. |
| ७ | ॲन्टी रेट्रोव्हायरल थेरपी | शुक्रवार | सकाळी १०.०० ते दुपारी १२.३० | ओ.पी.डी नं ९, १ ला मजला. ओ.पी.डी इमारत. |
| ८ | बालजठरांत्रिक रोग | बुधवार, शनिवार | सकाळी १०.०० ते दुपारी १२.३० | ओ.पी.डी नं ९, १ ला मजला. ओ.पी.डी इमारत. |

**१८. इतर आवश्यक माहिती**

या विभागात भारतीय विज्ञान परिषद प्रमाणित पद्व्युत्तर (बालरोगचिकित्साशास्त्र) (MD Pediatrics) व डिप्लोमा इन चाईल्ड हेल्थ (DCH) अभ्यासक्रम आहेत.

## मेडिकल ऑन्कॉलॉजीशस्त्र विभाग

बा.य.ल. नायर धर्मा. रूग्णालयातील कर्करोगग्रस्त प्रोढ व लहान मुलांसाठी ७५ खाटाचे केमोथेरीपी उपचार केंद्र मार्च २०१३ पासून सुरू करण्यात आले आहे. सदर ओ.पी.डी. आठवडयातून चार दिवस असतात.

सोमवार व शुक्रवार - प्राढ व्यक्तिसाठी

मंगळवार व गुरूवार - लहान मुलांसाठी

सन २०१५ मध्ये ११,००० रूग्णांची तपासणी करण्यात आली तसेच ५,००० रूग्णांना केमोथेरीपी उपचार देण्यात आले.

## श्वसनविकारशास्त्र विभाग

**विभागाची माहिती -**

श्वसन विभागाची स्थापना सन १९८१ मध्ये डॉ. जी.एस. पेल्हार आणि डॉ. ऐ.ऐ. महासुर यांच्या मार्गदर्शनाने झाली. डॉ. जे.एम. जोशी २००३ पासून प्राध्यापक व विभाग प्रमुख पदावर कार्यरत आहे. ऑगस्ट १९९७ पासून पश्चिम भारतामध्ये पहिली स्लीप लॅब चालू करण्यात आली होती.

**निर्णय घेण्याची पध्दत -**

श्वसनविकार पिडीत रुग्णांची सर्वप्रथम तपासणी व चाचणी केली जाते. विभाग प्रमुख व वरिष्ठ डॉक्टरांबरोबर चर्चा करून पुढील निर्णय घेतला जातो. रूग्णांना त्यांच्या आजाराची तपशीलवार माहिती दिली जाते आणि संदर्भित योग्य चाचण्या आणि उपचार केले जातात. गरज असल्यास रूग्णालयात भरती केले जाते. ब्रॉकोस्कोपी व श्वसनक्षमता चाचणी यासारख्या विशेष चाचण्या केल्या जातात. योग्य त्या ठिकाणी वेन्टिलेटर वापरला जातो. रूग्णालयातून सुट्टी दिल्यानंतर दर तीन महिन्यांनी चाचणी करता बोलवले जाते.

**अध्यापक -**

१) डॉ. जोशी ज्योत्सना प्राध्यापक व विभाग प्रमुख

२) डॉ. देसाई उन्नती सहाय्यक प्राध्यापक

३) डॉ. उत्पात केतकी सहाय्यक प्राध्यापक

**अभ्यासक्रम -**

एम.डी. पल्मॉनरी मेडीसीन

**बाहयरूग्ण वेळ -**

बाहयरूग्णांस सर्व दिवस सकाळी ०८.३० ते १२.३० पर्यंत (मंगळवार व शनिवार सोडून) तपासले जाते.

**रूग्णासाठी मार्गदर्शनतत्वे -**

बाहयरूग्ण विभागास तपासणीसाठी येताना. तपासणीची कागदपत्रे तसेच अगोदरचे वैद्यकिय उपचारांचे कागदपत्रे आणि क्ष-किरणच्या तपासणीचे अहवाल सोबत घेऊन यावेत.

**ठिकाण -**

२ रा मजला, ओपीडी इमारत, ओपीडी क्रमांक - ७

कार्यालय दुरध्वनी क्रमांक - ०२२ २३०२७६४३

विस्तारीत दुरध्वनी क्रमांक - ७६४२, ७६४३.

★ डॉ. जोशी ज्योत्सना मदन, प्राध्यापक व विभाग प्रमुख यांना उल्लेखनीय सेवा २०१० पारितोषीक गेरायाट्रीक सोसायटी ऑफ इंडिया.

## क्ष-किरण विभाग

क्ष-किरण विभाग हा सन १९४८ सालात निदान क्षमता असलेल्या ४ ते ५ मशिनव्दारे सुरू करण्यात आला. तद्नंतर या विभागाची प्रगती खुपच झाली असून आजमितीस हा विभाग खुपच उंचीवर आहे. आजच्या घडीला बा.य.ल. नायर धर्मा. रूग्णालयातील क्ष-किरण चिकित्सा, मॅमोग्राफी, अल्ट्रासोनोग्राफी, सी.टी. स्कॅन आणि एम.आर.आय. इत्यादी कार्यरत आहेत. या अत्याधुनिक सुविधांचा प्रती वर्षी २ ते २.५ लक्ष रूग्ण फायदा घेत आहेत.

सन १९९८ साली या रूग्णालयात कून्सरग्रस्त रूग्णांसाठी किरणोत्सर्ग विभाग सुरू करण्यात आला. उदा. केमोथेरपी, पॅलेटीव्ह थेरपी, ब्रॅकीथेरपी आणि आधार थेरपी इत्यादी.

वैद्यक क्षेत्रातील दिवसेंदिवस वाढत असलेल्या तांत्रिक आधुनिकीकरणामुळे तसेच प्रतीवर्षी वाढणा-या रूग्णसेवेचा विचार करता आधुनिक तंत्रज्ञानाने युक्त असलेली उपकरणे रूग्णांच्या सोईसाठी व फायदासाठी त्याचा विस्तार होणे अपरिहार्य ठरते.

**संस्था, कार्य आणि कर्तव्य यांचा तपशिल -**

क्ष-किरण विभागात खालील कर्मचा-यांचा समावेश आहे.

**१. वैद्यकीय अध्यापक -**

अ) प्राध्यापक व प्रमुख

ब) सहयोगी प्राध्यापक

क) सहाय्यक प्राध्यापक

ड) रजिस्ट्रार

**२. वैद्यकीय प्रशिक्षक -**

अ) प्रथम वर्ष, व्दितीय वर्ष व तृतीय वर्ष आवासी अधिकारी

ब) फेलोज (सहकारी)

क) विशेष वैद्यकीय अधिकारी

**३. तांत्रिक शाखा -**

अ) क्ष-किरण तंत्रज्ञ

ब) क्ष-किरण सहाय्यक

**४. इतर सहाय्यक कर्मचारी -**

अ) परिचारीका वर्ग

ब) अंधार कक्ष परिचर

क) सेवक आणि हमाल

**निर्णय प्रक्रियेतील पध्दती अनुसरण्याबाबत -**

क्ष-किरण विभागात खालील प्रमाणे निर्णय प्रक्रियेतील बाबी

१. विषय ठरविणे.

२. अध्यापकीय वर्गाला विषयाबाबत सुचना देणे.

३. सभेची तारीख ठरविणे.

४. सभेत आपसात चर्चा करणे.

५. चर्चेतून निर्माण झालेल्या सल्यांची सुची तयार करणे.

६. सर्वात उत्तम सल्ला निवडणे.

७. निवडलेला उत्तम सल्ला अंमलात आणने.

८. उत्कृष्ठ विचार/सल्ले कार्यान्वित करणे.

९. वैद्यकीय शाखेतील सन्माननिय सदस्यांनी स्वाक्षरी केलेल सभेतील इतिवृत्तांताची नोंद घेणे .

१०. निर्णय प्रक्रियेतील कार्यक्षमतेबाबत वेळोवेळी आढावा घेणे.

**कर्तव्य बजावण्यासाठी सर्वानुमते मान्य असलेले नियम -**

बा.य.ल. नायर धर्मा. रूग्णालयातील क्ष-किरण विभागातील कामकाज हे सर्वानुमते ठरलेल्या नियम पध्दतीनुसार पार पाडले जाते. तसेच ही कर्तव्ये पार पाडतांना बृहन्मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, एम.सी.आय. (मेडिकल कॉन्सील ऑफ इंडिया) आणि अणु उर्जा मंडल ए.ई.आर.बी. (ॲटोमिक एनर्जी रेग्युलेशन बोर्ड) यांनी घालून दिलेल्या मार्गदर्शक तत्वे, नियम व अधिनियम या नुसार पार पाडली जातात.

नागरीकांना उपलब्ध असलेल्या सेवा सुविधांबाबत माहिती मिळण्याबाबतचा तपशिल -

माहिती प्राप्त करण्याकरीता विविध प्रकारच्या उपलब्ध असलेल्या सेवा सुविधा म्हणजे सुचना फलक, विभागातील कार्यरत कर्मचा-यांकडून विचारणा करून केलेली माहिती, माहितीचा अधिकारी तथा संस्थेची वेबसाईट उपलब्ध.

**रेडिएशन ऑन्कॉलॉजी शास्त्र विभाग**

बा.य.ल. नायर धमार्दाय रुग्णालयाच्या रेडिएशन थेरपी विभाग, २१ मार्च १९९८ पासून अस्तित्वात आला. पॅलेएटिव थेरपी आणि सथेरपी उपचार पध्दतीची गरज आहे अशा रुग्णांवर देखील हया विभागात उपचार केले जातात. कर्करोग पीडित रुग्णावर उपचार करणारा हा एकमेव विभाग आहे. टेलेथेरपी, ब्रेकेथेरपी, आणि पॅलेएटिव मेडिसिन हयांसारख्या अत्याधुनिक सेवा पुरवण्यासाठी हया विभागात अदययावत सुधारणा करण्यात येत आहे.

**ब्रेकेथेरपी**

स्त्रीरोग शास्त्रीय, मस्तक - मान आिण जठरांत्र इत्यादी प्रकारच्या कर्करोगांवर उपचार करण्याकरीता टेलेथेरपी ऐवजी ब्रेकेथेरपी उपयुक्त ठरते. स्त्रियांना होणा-या ग्रीवा कर्करोगांवर ब्रेकेथेरपी, खुप उपयुक्त आहे . सदर पध्द्त औषधोपचार आणि कर्करोगयुक्त ग्रीवेची शस्त्रक्रीया केल्यानंतरही उपयुक्त ठरते. अंतर्गत रेडिओथेरेपीच्या

मात्रेमध्ये ब्रेकीथेरपीच्या वापराने  भर पडलेली आहे.

डिसेंबर २०१३ पासून हा विभाग दोन सत्रांमध्ये चालवला जातो.

सकाळ सत्र :- स. ०९.०० वा. पासून ०४.०० पर्यंत

दुपार सत्र :- दु. ०२.०० वा. पासून ०९.०० पर्यंत

ओपीडीच्या दिवशी नवीन पेशंटना बोलवून त्यांची नोंदणी केली जाते. आणि जुने पेशंट फॉलोअपसाठी बोलवले जातात.

या विभागात दररोज  ओपीडी  सुविधा  उपलब्ध आहे.

**सकाळ  सत्र ओपीडी** :-  सोमवार, बुधवार, शुक्रवार स. ०९.०० वा. पासून दु. १२.०० पर्यंत

**दुपार सत्र ओपीडी**  :- मंगलवार व गुरुवार  दु. ०२.००  वा. पासून दु. ०५.०० पर्यंत

**रेडिओथेरेपी  प्लानिंग**

मंगलवार व गुरुवार:- सकाळ  सत्र रेडिओथेरेपी  प्लानिंग

सोमवार, बुधवार, शुक्रवार  :- दुपार सत्र ओपीडी  रेडिओथेरेपी  प्लानिंग

**ब्रेकेथेरपी**

स्त्रीरोग शास्त्रीय, मस्तक, मान आणि जठरांत्रस्त्राव इत्यादी प्रकारच्या कर्करोगांवर उपचार करण्याकरिता रेडिओथेरपी ऐवजी ब्रॉकथेरपी उपयुक्त ठरते. स्त्रियांच्या होणा-या ग्रीवा कर्करोगांवर ब्रेकेथेरपी खूप उपयुक्त आहे. सदर पध्दत औषधोपचार आणि कर्करोगयुक्त ग्रीवेची शस्त्रक्रीया केल्यानंतरही उपयुक्त ठरते. सदरील पध्दत औषधोपचार आणि कर्करोगयुक्त ग्रीवेची शस्त्रक्रीया केल्यानंतरही उपयुक्त ठरते. रेडिओथेरपीच्या मात्रामध्ये ब्रेकेथेरपीच्या वापराची अंतर्गत भर पडलेली आहे.

ब्रेकेथेरपी उपचार दररोज सोमवार ते शुक्रवार स. ०९.०० वा. पासून दु. १२.०० पर्यंत.

**मेमोग्राफी यंत्र –**

हया यंत्राव्दारे स्तन कर्करोगाच्या निदानास मदत होते. अशा पध्दतीची सुविधा पुरविणारे महानगरपालिकेच्या रूग्णालयापैकी बा.य.ल. नायर धर्मा. रूग्णालय असे एकमेव रूग्णालय आहे. तसेच या रूग्णालयात ३ कर्करोग उपचार केंद्रे सुरू करण्यात आली आहे.

## नेत्रशल्यचिकित्सा विभाग

**नेत्रशल्यचिकित्सा विभागाचा इतिहास -**

नेत्रशल्यचिकित्सा विभागाची स्थापना १९२३ साली डॉ. सी.आर. आठवले यांच्या मार्गदर्शनाखाली झाली. त्यांच्या नंतर डॉ. हिरालाल पटले, मानद प्राध्यापक व विभाग प्रमुख (१९४५-१९५७) यांनी कार्यभार सांभाळला. १९४५ मध्ये, संपूर्ण तयार असे नेत्रचिकित्सा युनिट ची स्थापना झाली व १६ खाट हे केवळ डोळयांच्या रोग्यांसाठी आरक्षीत कारण्यात आले. डॉ. ए.एम. गोखले, मानद प्राध्यापक यांची नंतर नेत्रचिकित्सा विभाग प्रमुख म्हणून नेमणूक झाली. (१९५७-१९७१) डॉ. गोखले हयांचे व्यक्तीमत्व शिस्तीचे असून त्यांनी विभागाचा विस्तार केला. निवृत्तीनंतरही ते या विभागासाठी कार्यरत राहिले.

१९६९-१९७० या काळात डॉ. ॲब्रु हे मानद नेत्रचिकित्सक म्हणून कार्यरत होते. व युनिट २ चे ते पहिले प्रमुख झाले जे १९६९ मध्ये सुरू झाले. १९६९ साली महाराष्ट्र सरकारच्या अनुमतीने नेत्रपेटी ची सुरूवात, कॉर्निया ग्राफटींग ॲक्ट १९६९ च्या अंतर्गत झाली. या नंतर डॉ. पियुष दिक्षित यांची मानद प्राध्यापक व विभाग प्रमुख म्हणून नेमणूक झाली. (१९७१-१९८५) फिरते नेत्रचिकित्सा वॅन असे मुंबईतील एकमेव वॅन हे लोकांच्या सेवेसाठी १९७५ मध्ये सुरू करण्यात आले. त्यानंतर डॉ. (श्रीमती) ज्ञानम मुर्ती १९८५ मध्ये मानद प्राध्यापक व विभाग प्रमुख म्हणून कार्यभार २००४ पर्यंत सांभाळला. त्यांनी नायर मध्ये नेत्र विभागात शल्य क्रियाघर आणण्याचे महत्वाचे काम केले.

लायन्स क्लब ऑफ भायखळा ने देणगी दिलेले नविन अदयावत वॅन जून २००४ मध्ये सुरू झाले. डॉ. एच.एल. त्रिवेदी यांची नंतर सहयोगी प्राध्यापक व प्रभारी विभाग प्रमुख म्हणून नेमणूक झाली. (ऑगस्ट २००४ ते सप्टेंबर २००५) नंतर डॉ. ए.डी. निकल्सन यांनी प्राध्यापक व विभाग प्रमुख म्हणून कार्यभार सांभाळला. (सप्टेंबर २००५ ते ऑगस्ट २०१६) सध्या डॉ. सरोज आय. सहदेव विट्रोरेआयनल तज्ञ व प्राध्यापक, सप्टेंबर २०१६ पासून विभाग प्रमुख आहेत. त्यांच्या कार्यकाळात विभागाच्या सुधारणाकरिता मोठया प्रमाणात देणगी LCIF कडून मिळविण्यात आल्या. त्या आंतरराष्ट्रीय परिक्षा इंटरनॅशनल कौन्सिल ऑफ ऑफथालमोलॉजीच्या समन्वयक आहेत.

| अ.क्र. | नाव | पद |
| --- | --- | --- |
| ०१. | डॉ. सरोज आय. सहदेव | प्राध्यापक व विभागप्रमुख |
| ०२. | डॉ. अविनाश इंगोले | अतिरिक्त प्राध्यापक |
| ०३. | डॉ. अनामिका अग्रवाल | अतिरिक्त प्राध्यापक |
| ०४. | डॉ. दर्शना राठोड | सहयोगी प्राध्यापक |
| ०५. | डॉ. सुजित मुराडे | सहाय्यक प्राध्यापक |
| ०६. | डॉ. अनुजा घरात | सहाय्यक प्राध्यापक |
| ०७. | डॉ. ट्विंकल परमार | सहाय्यक प्राध्यापक |

**स्थळ –**

२ रा माळा, ओ.पी.डी. क्रमांक १०, ओ.पी.डी. इमारत,
बा.य.ल. नायर धर्मा. रूग्णालय आणि टो.रा. वैद्यकीय महाविद्यालय,
डॉ. ऐ. एल. नायर रोड, मुंबई सेंट्रल, मुंबई – ४०० ००८.

**विभाग**

नेत्र विभागाचे दोन भाग आहेत. बाहय रूग्ण विभाग व शल्यक्रियाघर आठवडयावर ६ दिवस चालू असतात. प्रत्येक भाग एक दिवसआड कार्यरत असतो. एकूण ६० खाटा आहेत. बाहय व आंतरूग्ण विभाग नियमित, विशेष आणि आपत्कालीन सेवा देतात.

विशेष चिकित्सा

१) दृष्टीपटल
२) तिरळेपणा
३) काचबिंदू
४) बुबूळाची तपासणी व कॉन्टक्ट लेन्स
५) बालनेत्र चिकित्सा
६) नेत्रमज्जातंतू
७) युनिआयटीस
८) नेत्रसुघटन शल्यचिकित्सा
९) शालेय तपासणी

तंत्रज्ञान व सेवा उपलब्धता -

१) बिना टाक्याचे मोतीबिंदू शस्त्रक्रिया, फोल्डेबल लेन्स सहीत

२) विट्रोरैटायनल विकार, मुल्यमापन व उपचार, मधुमेह व आर.ओ.पी. स्क्रिनिंग

३) बालनेत्रचिकित्सा व तिरळेपणा मुल्यमापन व उपचार

४) बुबूळ प्रत्यारोपण शस्त्रक्रिया

५) नेत्रसुघटन शल्यचिकित्सा व अश्रुनलिका संबंधी शस्त्रक्रिया

६) काचबिंदू मुल्यमापन व उपचार

७) चष्म्याचे नंबर तपासणी, मोफत चष्मे, केराटोमेट्री व कॉन्टॅक्ट लेन्स

८) इनडायरेक्ट ऑफथालमोस्कोपी, बायोमायक्रोस्कोपी व टोनोमेट्री

९) ऑप्टीकल कोहरन्सटोमोग्राफी, विजुअल फिल्ड, सोनोग्राफी (ए स्कॅन बी स्कॅन)

१०) सिनॉप्टोफोर व टेसस्क्रीन

११) लेझर - ग्रीन लेझर व यॅग लेझर

१२) आपत्कालीन नेत्र सेवा व नेत्रदान सेवा २४ ७ उपलब्ध

इतर सेवा

१) फिरते नेत्रचिकित्सा वॅन सामाजिक कार्यासाठी उपलब्ध

२) नोदणीकृत नेत्रपेढी - विभाग नेत्रदान प्रसारमाध्यमामध्ये एक मोलाची भूमिका बजावते.

## त्वचा व गुप्तरोग विभाग

**वर्ष - २०१६ (वैद्यकीय नियतकालिकातील प्रकाशने)**

| | |
|---|---|
| १) त्वचा व कर्करोग विषयावरील | - ४ |
| २) त्वचेचे संसर्गजन्य रोग | - २ |
| ३) त्वचा व बालरोग | - ३ |
| ४) त्वचा व पिग्मेंटेशन | - ४ |

**वर्ष - २०१५**

| | |
|---|---|
| १) त्वचा व बालरोग | - १ |
| २) लायकन लिनस | - १ |
| ३) त्वचा व गुप्तरोग | - १ |

४) गरोदरपणातील त्वचेचे आजार - १

५) चेह-यावरील त्वचेचे विकार - १

**वर्ष – २०१४**

१) सोरायसीस व श्वेतकुष्ठ - १

२) त्वचा व रक्तवाहिन्यांचे आजार - १

३) पेग्फीगस आणि उपचार - १

४) पिम्पल आणि त्यामुळे होणारे व्रण - १

५) कुष्ठरोग - १

**वर्ष - २०१३**

१) त्वेचेच्या गाठी - ३

२) लायकल प्लान्स - २

३) उर्मास्कोपी - १

४) अनुवंशिक त्वचेचे आजार - १

५) केमीकल पिल्स - १

**वर्ष २०११/२०१२**

१) डमॉस्कोपी - १

२) कुपोषण व त्वचेचे आजार - १

३) त्वचेच्या रक्तवाहिन्यांचे आजार - १

४) औषधाचे दुष्परीणाम - १

५) नखांचे आजार - १

६) फंगल इन्फेकशन - २

**बक्षिसे**

**वर्ष - २०१६**

डॉ. अदिती चोणकर यांना पिग्मेन्टरी कॉर्न या परिषदेत ॲवार्ड पेपर या श्रेणीमध्ये तृतीय बक्षिस मिळाले.

टोरेंट यंग स्कॉलर ॲवार्ड डॉ. उध्दव झांवरे व आदिती चोणकर यांनी पश्चिम विभागाच्या प्रश्न मंजूषेसाठी निवड.

डॉ. केतन कोळेकर यांना 'आशियन इरमॅटोलॉजी' परिषद मुंबई ॲवार्ड पेपर या श्रेणीमध्ये प्रथम पारितोषिक.

डॉ. विन्नी यांना क्युटीकॉन परिषद मुंबई वर्ष २०१६ पोस्टर प्रेझेन्टेशन मध्ये प्रथम पारितोषिक.

डॉ. स्वागता तांबे (सहा. प्राध्यापक) 'क्युटीकॉन' मुंबई वर्ष - २०१६ फ्री पेपर कॅटेगरी/श्रेणी मध्ये प्रथम पारितोषिक.

एमओऐसीएस २०१६ मध्ये उत्कृष्ठ गुप्तरोग विभाग म्हणून निवड.

बा.य.ल. नायर धर्मा. रूग्णालयात स्वच्छता विभागात तिसरे पारितोषिक.

डॉ. चित्रा नायक यांची 'आशियन त्वचारोग परिषद' वर्ष २०१६ करिता संयुक्त चेअरपरसन पद भुषविले.

**वर्ष – २०१५**

टोरेन्ट यंग स्कॉलर अवॉर्ड 'डॉ. दिप्ती कटारिया' यांची प्रश्नमंजुषेच्या अंतिम फेरीसाठी निवड.

डॉ. रश्मी आढेराव यांना कॉस्मेटिक डरमॅटोलॉजी परिषद अवॉर्ड पेपर या श्रेणीमध्ये तृतीय पारितोषिक.

डॉ. रमय्या सी. यांना आयएसपीडी परिषदेत अवॉर्ड पेपर या श्रेणीमध्ये व्दितीय पारितोषिक.

डॉ. प्रियल गाला यांना क्यूटीकॉन परिषद वर्ष २०१५ सालाकरिता उत्कृष्ठ शोधनिंबधासाठी डॉ. अरविंद लोणकर या पुरस्कानी गौरविण्यात आले.

डॉ. स्वागता तांबे यांना चौथ्या आंतरराष्ट्रीय नखरोग परिषद अवॉर्ड पेपरच्या श्रेणीमध्ये प्रथम पारितोषिक मिळाले.

**वर्ष - २०१४**

डॉ. अदिती कटारिया व प्रियल गाला यांना ॲस्थेटिक प्रश्नमंजुषा - २०१४ मध्ये तृतीय पारितोषिक

डॉ. प्रियल गाला यांना कॉस्डरम परिषद २०१४ मुंबई मध्ये प्रथम पारितोषिक डॉ. दिप्ती कटारिया यांना कॉस्डरम परिषद २०१४ मुंबई मध्ये व्दितीय पारितोषीक.

डॉ. दिप्ती कटारिया यांना ओनॉयकोकान २०१४ करिता प्रथम पारितोषिक.

डॉ. प्रियल गाला यांना डॉ. एस.एल. वाधवा क्यूटीकॉन अंतर्गत अंतिम फेरिसाठी निवड.
डॉ. रश्मी आढेराव यांची क्युटीकॉन करिता विशेष प्राविण्य मिळाले.
डॉ. प्रियल गाला यांना आयएसडीएस स्टेटस्मेन स्कॉलरशिप, जेरूसलेम ईसराईल मिळाली.

**वर्ष - २०१३**

डॉ. आशिष खंडारे यांना पश्चिम विभाग (क्यूटीकॉन व उरमाझोन) २०१३ मध्ये उत्कृष्ठ पोस्टरसाठी गौरविण्यता आले.
डॉ. स्वागता तांबे यांना क्यूटीकॉन व उरमाझोन पश्चिम वर्ष २०१३ उत्कृष्ट पोस्अरकरिता निवड.

**वर्ष – २०१२**

डॉ. दिप्ती घिय यांना क्युटीकॉन - २०१२ उत्कृष्ट शोधनिबंधासाठी डॉ. अरविंद लोणकर पुरस्काराने गौरविण्यात आले.
डॉ. महिम जैन यांना ॲस्टीकॉन वर्ष - २०१२ निबंधलेखन स्पर्धेमध्ये व्दितीय पारितोषिक
डॉ. दिप्ती घिय महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापिठाकडून घेण्यात आलेल्या परिषदेमध्ये एम.डी. डरमॅटोलॉजी/त्वचा व गुप्तरोग परिषद व्दितीय क्रमांक मिळविला.

**वर्ष – २०११**

डॉ. पुनित सरोगी 'डरमाकॉन २०११' मध्ये उत्कृष्ट शोधनिंबंधाकरिता निवड.
डॉ. रेश्मा गडकरी उरमाकॉन २०११ मध्ये उत्कृष्ट पोस्टर अवॉर्ड करिता निवड.
डॉ. दिप्ती घिय उरमाकॉन २०११ मध्ये पोस्टर अवॉर्डकरिता विशेष प्राविण्य मिळविले.
डॉ. दिपल देशपांडे व डॉ. सुनिल मिश्रा यांना 'जागतिक त्वचारोग परिषद सेऊल दक्षिण कोरिया' करिता शिष्यवृत्तीसाठी निवड.
डॉ. रेश्मा गडकरी यांची 'डरमाझोन पश्चिम २०११' मध्ये उत्कृष्ट शोधनिंबधाकरिता प्रथम पारितोषिक.
लॉरियल पिग्मेन्टेशन रिसर्च कडून संशोधनाकरिता अनुदान मिळाले.
विषय - अ स्टडी ऑफ क्लिनीकोपॅथालोजिकल कोरिलेशन ऑफ पेरीऑरवायटल हायपर पिग्मेन्टेशन.

## बधिरीकरणशास्त्र विभाग

टो. रा. वैद्यकीय महाविद्यालय व बा. य. ल. नायर धर्मा. रुग्णालय, मुंबई – ४०० ००८.

**बधिरिकरण शास्त्र विभागिय माहिति**

बधिरीकरणशास्त्र हा विभाग मुख्य रुग्णालयाखेरीज बधिरीकरण सेवा खालील रुग्णालयात चालविते.

१. बा. य. ल. नायर धर्मा. रुग्णालय (मुख्य रुग्णालय)
२. नायर दंत रुग्णालय, मुंबई सेंट्रल
३. कस्तुरबा सांसर्गिक रुग्णालय , चिंचपोकळी
४. कान, नाक, घसा रुग्णालय,फोर्ट – वर्षातून चार महिन्याकरीता दोन वेळा
५. शीवरी रुग्णालय – आठवडयातून दोन वेळा.

बधिरीकरणशास्त्र विभाग पुढील सेवा / काम करते.

I) क्लिनिकल कामे   II) प्रशासकीय कामे   III) शैक्षणिक व प्रगतिसाध्ये

**क्लिनिकल कामे -**

अ) बधिरीकरण सेवा
ब) बाहयरुग्ण विभाग सेवा
क) अतिदक्षता विभाग सेवा
ड) वेदनाक्षमन केंद्र सेवा

**अ) बधिरीकरण सेवा** खालील मुख्य आणि अतिविशेष शाखांमध्ये शस्त्रक्रीयेपूर्वी, शस्त्रक्रीयेमध्ये व शस्त्रक्रीयेनंतरचे व्यवस्थापन करते.

**मुख्य शाखा -**

| | | |
|---|---|---|
| 1 | सामान्य शस्त्रक्रीया | ६ शस्त्रक्रीया टेबल |
| 2 | कान, नाक, घसा शस्त्रक्रीया | ४ शस्त्रक्रीया टेबल |
| 3 | नेत्रचिकित्सक शस्त्रक्रीया | ३ शस्त्रक्रीया टेबल |
| 4 | स्त्रीरोग व प्रसूतीशास्त्र शस्त्रक्रीया | ३ शस्त्रक्रीया टेबल |
| 5 | अस्थीव्यंग शस्त्रक्रीया | २ शस्त्रक्रीया टेबल |

**अतिविशेष शाखा -**

| | | |
|---|---|---|
| 6 | ह्रदय शस्त्रक्रीया | १ शस्त्रक्रीया टेबल |
| 7 | मज्जातंतू शस्त्रक्रीया | १ शस्त्रक्रीया टेबल |
| 8 | प्लास्टीक शस्त्रक्रीया | २ शस्त्रक्रीया टेबल |
| 9 | युरोलॉजी शस्त्रक्रीया | २ शस्त्रक्रीया टेबल |
| 10 | बालरुग्ण शस्त्रक्रीया | २ शस्त्रक्रीया टेबल |
| 11 | अपघात विभाग शस्त्रक्रीया | २ शस्त्रक्रीया टेबल |
| 12 | दंतविभाग व मेक्झीलो फेशियल शस्त्रक्रीया | ३ शस्त्रक्रीया टेबल |

त्याचप्रमाणे बधिरीकरण सेवा खालील ठिकाणी दिल्या जातात.

१३. कार्डीयॅक कॅथेडरायझेशन प्रयोगशाळा

१४. इलेक्टोकनव्लजीव थेरपी (कक्षामध्ये)

१५. सी.टी. स्कॅन

१६. रेडीयोथेरपी
१७. रेडीयोलॉजी
१८. एम. आर. आय.
१९. गॅस्टोएन्टोलोजी (एन्डोस्कोपीकरीता )

**ब)** बाहयरुग्ण विभाग सेवा - नायर रुग्णालय व नायर दंत रुग्णालयामध्ये बाहयरुग्ण विभाग सेवा सुध्दा दिली जाते.

**क)** अतिदक्षता विभागसेवा - आम्ही नेहमीच बिकर्टस्थितीतील शस्त्रक्रीयेनंतरचे आणि अपघातग्रस्त रुग्ण देखील खालील विभागात पाहतो.

शस्त्रक्रीयेनंतरचे रुग्ण रीकव्हरी विभागात (20 बेड)

अपघातग्रस्त रुग्ण विभागात (१० बेड)

गंभीररस्थीतीतील रुग्णाच्या ह्रदय व कृत्रिम श्वासोश्वास तसेच इतर अवयवाची काळजी २४ तास व वर्षाचे ३६५ दिवस आम्ही घेतो. त्याचप्रमाणे बधिरीकरणातून बाहेर येणा-या रुग्णाची काळजी आम्ही अस्थीव्यंग शस्त्रक्रीया, स्त्रीरोग व प्रसूतीशास्त्र शस्त्रक्रीया व दंतरुग्णालयातील रीकव्हरी रुममध्ये घेतो. तीव्र वेदनाक्षमन सेवा सुध्दा आमच्या वरील विभागातील महत्वाचा भाग आहे.

**ड)** वेदनाक्षमन केंद्र :- निरनिराळया कारणामुळे रुग्ण वेदना सहन करीत असतात त्याकरीता निरनिराळया पध्दतीने त्यावर उपचार या वेदनाक्षमन केद्रात केले जातात.

**बधिरीकरण प्रयोगशाळा सेवा –**

ब्लड गॅस ऐनालिसीज, सीरीम इलेक्ट्रोलायट व पल्मनरी फंक्शन या चाचण्या मुख्य शस्त्रक्रीया गृहाच्या बाजूला असलेलया बधिरीकरण प्रयोगशाळेत केल्या जातात. मागील वर्षात ६७२४ ए.बी.जी. इलेक्ट्रोलायट व ५२४ पल्मनरी फंक्शन या चाचण्या केल्या गेल्या..

बधिरीकरणशास्त्र विभाग देत असलेल्या सुविधा -

अ) संपुर्ण चेतनाहरण
ब) सेंट्रल न्यूरोब्लॉकेड
क) रीजनल नर्व्हब्लॉक्स
ड) लोकल ऍनेस्थेशिया
इ) वेदनाक्षमन केंद्र

या व्यतिरिक्त रुग्ण ऍनस्थेशियामधून रिकव्हर होउुन नेहमीप्रमाणे रिकव्हरीरुममध्ये खालील

शस्त्रक्रीयागृहाच्या बाजूला असतात.
अ) अस्थीव्यंग शस्त्रक्रीया गृह
ब) स्त्रीरोग व प्रसूतीशास्त्र शस्त्रक्रीया गृह
क) दंतविभाग रीकव्हरी कक्ष
ड) कान, नाक, घसा शस्त्रक्रीया गृह

वेदनाक्षमन सेवा व लेबर ऍनेलजेसिया सेवा हया आपल्या कार्यातील अत्यंत अत्यावश्यक सेवा आहेत.

बधिरीकरणशस्त्र विभाग वेगवेगळया सर्जिकल विभागाने आयोजित केलेल्या कार्यशाळेसाठी मदत करतात.

विभागच्या वेद्नाक्षमण केन्द्रात निरनिराळया कारणामुळे रुग्ण वेदना सहन करीत असतात त्यांच्यावर वेगवेगळ्या पध्दतीने त्यावर उपचार केले जातात.

बधिरिकरण विभागातर्फे अतिआवश्यक रुग्णवाहिका सेवा पुरविली जाते.

- **प्रशासकीय कामे –**

1) सर्व प्रशासकीय कामे ही चिकिस्तालिन सेवा, रीसर्च व शैक्षणिक कार्य आहेत.

2) बधिरीकरण विभागाला बधिरीकरण विभागासाठी व इतर वेगवेगळया विभागासाठी

लागणा-या यंत्राची व उपकरणांची खरेदी करण्यासाठी लागणा-या सर्व गोष्टीबाबत प्रशासकीय कामे करावी लागतात.

3) अतिदक्षता विभागात, शस्त्रक्रीया गृहामध्ये व इतर जागी लागणा-या यंत्राची व उपकरणांची देखभाल व सेवासंविदाकरार करावा लागतो.

4) कमीतकमी ६ ते १० रुग्ण कोणत्याही वेळी दोन्ही अतिदक्षता विभागात श्वसनयंत्रावर असतात.

**5) III) शैक्षणिक व प्रगतिसाध्ये -**

- सर्व शिक्षकांनी चांगल्याप्रकारे पोस्टग्रॅज्युयट विद्यार्थ्यांना त्यांच्या थिसीससाठी मार्गदर्शन व मदत केली. सध्या १४ पोस्टग्रॅज्युयट विद्यार्थी शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली त्यांचे थिसीस पुर्ण करीत आहेत.

- पोस्टग्रॅज्युयट विद्यार्थी त्यांच्या नेहमीच्या अभ्यासाबरोबर दुसरे विषय सुध्दा शिकत असतात.

शिक्षक संख्या-

| अ.क्र. | पद | भरलेल्या जागा | रिक्त जागा |
|---|---|---|---|
| 1 | प्राध्यापक | 5 | 1 |
| 2 | सहयोगि प्राध्यापक | 11 | 0 |
| 3 | सहाय्यक प्राध्यापक | 14 | 12 |

**विभागांर्तगत निर्णय प्रक्रिया-**

बधिरिकरण शास्त्र विभागातिल सर्व निर्णय विभागाचे प्राध्यापक व प्रमुख डॉ. पिनाकीन गुज्जर हेच घेतात.

## मानसोपचारशास्त्र विभाग

मनोविकृतीशास्त्र विभाग ISO ९००१:२०१५ प्रमाणित

पार्श्वभूमी :

मनोविकृतीशास्त्र विभागाचा बाह्यरुग्ण विभाग १९३३ साली डॉ के .ए . लालकाका यांनी सुरु केला. डॉ एस.एम. लुल्ला विभागप्रमुख असताना १९६२-१९८१ या काळात विभागाचा विस्तार झाला, १९८२-१९९२ दरम्यान डॉ ए .पी. पाटकर यांच्या नेतृत्वाखाली ह्या विभागाची प्रगती सुरु राहिली. त्यांच्यानंतर १९९२-२००५ दरम्यान डॉ श्रीमती .एच .एस .ढवळे पहिल्या पूर्णवेळ प्राध्यापक विभागप्रमुख बनल्या. २००५ सालापासून डॉ .आर .एम .कामथ विभागप्रमुख आहेत. या विभागात डॉ. पी.सी.शास्त्री (१९९६ मध्ये निवृत्त), डॉ. आर .आर. पटेल (२००४ मध्ये निवृत्त ),डॉ. सी.पिंटो (२०१३ मध्ये निवृत्त) यांनी मानद प्राध्यापक म्हणून काम केले .

हा मनोविकृतीशास्त्र विभाग ISO ९००१:२०१५ प्रमाणित आहे- (गुणवत्ता हमी )(चालू १० वे वर्ष )

**अध्यापक :**

| अनुक्रमांक | नाव | पद |
|---|---|---|
| १ | डॉ .आर .एम .कामथ | प्राध्यापक व विभागप्रमुख |
| २ | डॉ . हिनल शाह | सहयोगी प्राध्यापक( अतिरिक्त प्राध्यापक) |
| ३ | डॉ.जाहनवी केदारे | सहयोगी प्राध्यापक |
| ४ | डॉ. अलका सुब्रमण्यम | सहाय्यक प्राध्यापक |
| ५ | डॉ. श्रीलक्ष्मी व्ही . | सहाय्यक प्राध्यापक |
| ६ | डॉ. डिंपल दादरवाला | सहाय्यक प्राध्यापक |

**कर्मचारी -**

१.चिकित्सक मानसशास्त्रज्ञ : श्रीमती मानसी जोशी

२. मनोविकार सामाजिक अधिकारी : श्रीमती पद्मजा कानिटकर

३. ई .ई .जी .तंत्रज्ञ : श्री विजय मोगरे

**स्थान -**

बाह्यरुग्णविभाग : ओ .पी .डी . क्र . १३, पहिला मजला ,ओ .पी.डी .इमारत .

आंतररुग्णविभाग : कक्ष क्र . १, ४ था मजला, ओ .पी.डी .इमारत.

**युनिट -**

| युनिट | कर्मचारी सदस्य | पद |
|---|---|---|
| युनिट १ | डॉ .आर .एम .कामथ<br>डॉ.जाह्नवी केदारे<br>डॉ. अलका सुब्रमण्यम | प्राध्यापक व विभागप्रमुख<br>सहयोगी प्राध्यापक<br>सहाय्यक प्राध्यापक |
| युनिट २ | डॉ . हिनल शाह<br>डॉ. श्रीलक्ष्मी व्ही<br>डॉ. डिंपल दादरवाला | सहयोगी प्राध्यापक( अतिरिक्त प्राध्यापक)<br>सहाय्यक प्राध्यापक<br>सहाय्यक प्राध्यापक |

रुग्णांनी ओ .पी .डी . च्या वेळा :

८:३० ते १:०० ( सोमवार ते शुक्रवार )

८:३० ते १२:०० ( शनिवारी )

रुग्णांसाठी सूचना :

सर्व नवीन रुग्णांनी बाह्यरुग्णविभाग नोंदणी खिडकी क्र .४ वरून ओ.पी.डी . १३ चा केसपेपर घेऊन येणे .

(वेळ- सकाळी ८ ते दुपारी ११)

त्यानंतर रुग्णांनी पहिल्या मजल्यावरील मनोविकृतीशास्त्र (ओ.पी.डी १३) विभागात आल्यावर नोंदणी खिडकीत नोंदणी करून आत यावे .

तुमच्या गरजेनुसार आणि उपलब्धतेनुसार पुढील तपासणीसाठी परिचारिका/ डॉक्टर तुम्हाला मार्गदर्शन करतील.

**उपलब्ध सुविधा –**

सामान्य सेवा :

- दैनंदिन आरोग्य सेवा : बाह्यरूग्ण आणि आंतररुग्ण सेवा
- तात्काळ सेवा : आपत्कालीन सेवा
- रुग्णालायातील इतर विभागांसाठी मानसोपचार तज्ज्ञांच्या सल्ल्याची सुविधा
- तपासण्या : ई .ई .जी , मानसशास्त्रीय चाचण्या
- उपचारपद्धती : औषधोपचार , इलेक्ट्रोकन्व्हलझिव्ह उपचारपद्धती (ई सी टी), वर्तवणूक उपचार (बिहेविअर थेरपी), मानसोपचार पद्धती ( वैयक्तिक आणि समूह)
- गट समुपदेशन सुविधा :( दुपारी २ वाजता )

१. आत्महत्येचा प्रयत्न आणि हेतुपूर्वक स्व-इजा करणाऱ्यांसाठी समुपदेशन गट ( सोमवारी )

२.छिन्नमनस्कता असणा-या रुग्णांच्या नातेवाईकांसाठी समुपदेशन गट (मंगळवारी )

३.मनोलैंगिक आणि विवाहसमुपदेशन गट (बुधवार)

४.स्मृतिभ्रंश झालेल्या रुग्णांच्या नातेवाईकांसाठी समुपदेशन गट (गुरूवारी )

५.व्यसनग्रस्त रुग्णांच्या नातेवाईकांसाठी समुपदेशन गट (शनिवारी )

विशेष सुविधा

१. शालेय मानसिक आरोग्य चिकित्सालय ( दररोज )

- भारतातील पहिली समाजभिमुख बालमनोविकार प्रतिबंधात्मक सुविधा
- १९७९ साली प्रायोगिक तत्वावर सुरु करण्यात आली .
- १९८२ साली ही सेवा एक विभाग म्हणून पूर्णपणे विकसित झाली ज्याचे कार्य सहाय्यक प्राध्यापक , निवासी वैद्यकीय अधिकारी , २ मानसशास्त्रज्ञ , २ मनोविकार समाज अधिकारी पाहतात .
- हा प्रकल्प भारतातील इतर बालमनोविकार विभागांसाठी पथदर्शी ठरला .

- २००६ साली शालेय मानसिक आरोग्यावर पहिल्या राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले .
- शालेय मानसिक आरोग्य चिकित्सालयात प्ले थेरपीची सुरुवात करण्यात आली .
- सुरूवातीला ही सेवा दोन गट देत होते, एक गट हॉस्पिटल मध्ये आणि दुसरा फिरता गट शाळांना भेटी देऊन सेवा देत अस त, प्रत्येक गटात मानसोपचारतज्ज्ञ , सामाजिक अधिकारी , मानसशास्त्रज्ञ असत. फिरता गट दरवर्षी शाळांना भेटी देऊन विद्यार्थ्यांची तपासणी करत असत. पण सध्या मुलांच्या समस्येबद्द्ल शाळांमधल्या वाढत्या जागरूकतेमुळे आणि सर्व शिक्षा अभियानाच्या कामामुळे फिरता गट रदद करण्यात आला आहे .
- शालेय मानसिक आरोग्य चिकित्सालय कामकाज:
  -चिकित्सालयातील टीम शाळेतून, रुग्णालयातून पाठवलेले आणि स्वत:हून येणाऱ्या रुग्णांची तपासणी करतात.
  -मनोविकृतीशास्त्र निवासी वैद्यकीय अधिकारी, सामाजिक अधिकारी, मानसशास्त्रज्ञ दरवर्षी २००० पेक्षाही जास्त बालरुग्णांची प्रथम तपासणी आणि ८००० बालरुग्णांची फेरतपासणी करतात.
  -बौद्धिक अपंगत्व असलेल्या मुलांची तपासणी करुन त्यांना सवलतींसाठी प्रमाणपत्र दिले जाते
- शालेय मानसिक आरोग्य चिकित्सालयातील कर्मचारी वृंदाशी तुम्ही सकाळी ९ ते दुपारी ४ ह्या वेळेत ०२२ २३०२७५५२ वर संपर्क साधू शकता .

२ अध्ययन अक्षमता चाचणी केंद्र (लर्निंग डिसॅबिलिटी):

1. अध्ययन अक्षमतेसाठी समुपदेशन व चाचणी करून प्रमाणपत्र दिले जाते (हे प्रमाणपत्र सर्व राज्य अन राष्ट्रीय परीक्षा मंडळांकडून स्वीकारले जाते). विशिष्ट वाचन दोष(डिस्लेक्सिया) , विशिष्ट लिखाण दोष (डिस्ग्राफिया) ,विशिष्ट गणित दोष (डिसकॅल्कुलिया) साठी उपचारात्मक (रेमेडिअल) शिक्षणाची सुरुवात देखील करण्यात

आलेली आहे.

2. नोंदणी: वेळ सकाळी ९ ते १०:३० (सोमवार ते शुक्रवार)

3. फोन नंबर : ०२२ २३०२७६५९

३. ऑटिझम (स्वमग्नता) सुविधा

अ) ऑटिझम निदान केंद्र:

मानसोपचार तज्ञ, मानसशास्त्रज्ञ, बालरोगतज्ञ ,विशेष शिक्षक(स्पेशल एज्युकेटर) ,वाचा(स्पीच) आणि व्यवसोपचार तज्ज्ञ यांचा समावेश असणाऱ्या टीम कडून मुलांची सर्वकष तपासणी करून ऑटिझम चे प्रमाणपत्र दिले जाते जे सर्व परीक्षा मंडळाकडून ऑटिझम असणाऱ्या मुलांना परीक्षेत सवलती देण्यासाठी स्वीकारले जाते .

ब )ऑटिझम डायनॅमिक इंटरव्हेंशन्स(आदी) -

ऑटिझम डायनॅमिक इंटरव्हेंशन्स ही ऑटिझम असणाऱ्या मुलांसाठीची शाळा आहे. इथे मानसोपचार तज्ञ, मानसशास्त्रज्ञ, बालरोगतज्ञ, विशेष शिक्षक(स्पेशल एज्युकेटर ), स्पीच आणि व्यवसोपचार थेरपीस्ट यांचा समावेश असणाऱ्या टीम कडून शाळेतील विद्यार्थ्यांना सर्वकष सुविधा दिल्या जातात. इथे २५ विद्यार्थ्यांची काळजी घेण्यासाठी ८ विशेष शिक्षक आहेत . शाळेत २ वर्षे -१६ वर्षे वयोगटातील मुले असून शाळा सकाळी (९ ते १२) आणि दुपारी (१ ते ४) ह्या दोन सत्रात भरते.

ऑटिझम डायनॅमिक इंटरव्हेंशन्स च्या कर्मचारी वृंदाशी सकाळी ९ ते दुपारी ४ ह्या वेळेत ०२२ २३०२७६६३ नंबर वर संपर्क साधू शकता .

४. उपचारात्मक (रेमेडीअल )केंद्र: विवेकानंद उपचारात्मक (रेमेडीअल) केंद्र

सोमवार ते शुक्रवार - दुपारी २ ते रात्री ७ वाजेपर्यंत

शनिवार - सकाळी ९ ते दुपारी २ फोन नंबर : ९८६९४३९४०८

५.वृध्दांसाठी मानसोपचार सेवा :

२००८ सालापासून ही सेवा सुरु झालेली आहे

यात ५५ वर्षांवरील वृद्धांची त्यांच्यामधील बौद्धिक , मानसिक आणि भावनिक समस्यांचे मूल्यांकन करण्यासाठी व्यापक तपासणी केली जाते .

## उपलब्ध शैक्षणिक अभ्यासक्रम –

| अभ्यासक्रम | अनुक्रमांक |
|---|---|
| एम .बी.बी .एस . | १ |
| एम.डी.(मनोविकृतीशास्त्र ) | २ |
| मनोविकृतीशास्त्र डिप्लोमा | ३ |

(वरील सर्व अभ्यासक्रम महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ आणि मेडिकल कौन्सिल ऑफ इंडिया मान्यताप्राप्त आहेत)

शैक्षणिक सुविधा :

पदवीपूर्व :

एम .बी.बी .एस . , बी .पी .टी एच,

बी .ओ .टी एच, बी एससी नर्सिंग

सामाजिक कार्यकर्ता विदयार्थी

पदव्युत्तर :

एम.डी .

डी .पी.एम .

<u>उपक्रम :</u>

- क्लिनिकल मीटिंग्स
- कार्यशाळा
- भित्तीपत्रके स्पर्धा
- डॉ . ए . पी. पाटकर व्याख्यान : २००९ साली सरांच्या विद्यार्थ्यांनी दिलेल्या देणगीतून ह्याची सुरुवात झाली . पहिले व्याख्यान डॉ . चित्तरंजन आंद्रदे (प्राध्यापक ,निमहान्स बेंगलोर ) यांनी दिले .
- पदवीपूर्व विद्यार्थ्यांसाठी डॉ .एस .एम .लुल्ला स्पर्धापरीक्षा

- जागतिक मानसिक आरोग्य सप्ताह : दरवर्षी ४ ते १० ऑक्टोबर हा सप्ताह साजरा केला जातो, या सप्ताहात विविध वैशिष्ट्यपूर्ण उपक्रमांचे आयोजन करण्यात येते .

- रुग्णालय , संस्था आणि प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये भित्तीपत्रके स्पर्धा घेतली जाते.

-मानसिक आरोग्यावर कार्यशाळा व चर्चासत्रांचं आयोजन केले जाते .

-मानसिक रुग्ण व त्यांचा परिवार आणि सर्वसामान्य जनतेला दरवर्षी माहितीपत्रके दिली जातात .

-मानसिक आरोग्य शिबिरांचे आयोजन

-शाळा , कॉलेज ,कंपनी ,झोपडपट्टीत मानसिक आरोग्याचे सर्वेक्षण आणि व्याख्याने .

-मानसिक आरोग्यावर पथनाट्य आणि समाजजागृती

6) जागतिक स्वमग्नता दिन

7) जागतिक छिन्नमनस्कता दिन

8) जागतिक अल्झायमर्स (स्मृतिभ्रंश ) दिन

बृहन्मुंबई महापालिकेच्या कर्मचाऱ्यांसाठी विशेष सुविधा :

- ताणतणाव व्यवस्थापन

- संभाषण कौशल्य

- मन:पूर्वक : मानसिक आरोग्याशी संबधित माहितीपत्रक जे रुग्णालयाच्या आवारात तीन वेगवेगळ्या ठिकाणी लावले जाते

प्राप्त पारितोषिके :

1.Cleanest OPD Nair Hospital - 1st prize (2016)

2. Cleanest ward Nair Hospital - 2nd prize (2016

3. Effects of mindfulness and lifestyle modification on ageing: 1 st prize GERON 2016 Dr. Bhagyashree Giakwad, Dr. Dimple Dadarwala, Dr. Alka. A. Subramanyam, Dr. R. M. Kamath

4. Study of quality of sleep, qual;ity of life and cognition in elderly: normal, depressed and with mild

neurocognitive sdisorder- 1st prize GERON 2015, Dr. Samiksha Jadhav, Dr. Shipra Singh, Dr. Alka. A. Subramanyam, Dr. Dr. R. M. Kamath

5. Study of cognitive profile in elderly patients presenting with both depressive and cognitive symptoms- 1st prize SMt. Shweta Tiwari young researcher award 2015, Dr. Shipra Singh, Dr. Sunitha Shankar, Dr. Alka. A. Subramanyam, Dr. Dr. R. M. Kamath

6. Neuropsychological predictors and structural MRI in relation to MCI : 1 year longitudinal study- Dr. A.V. Shah award (ACIPS WZ 2015) Dr. Ashish Chepure, Dr. Shruti Parab, Dr. Alka. A. Subramanyam, Dr.C. Pinto

7. Comparision of DSM IV TR and DSM V in diagnosis of Autism Spectrum Disorder- 3rd prize for best poster 2015 Dr. R. R. Patel awad Dr. Sheron Norenj, Dr. Apurva Kamveer, Dr. Henal R. Shah

8. Sleep disturbances in children with ADHD: comparative study with them healthy siblings: 3rd prize paper presentation DYPSCAP 2015 DR. Shrilaxmi, Dr. Tejas Gayal, Dr. Henal. R. Shah, Dr. R. M. Kamath

9. Clinical and neurodevelopmental profile of Autism : data from speciality autism clinic: 1st prize poster presentation DYPSCAP 2015, Dr. Ashish Chepure, Dr. Devararat Harshhe, Dr. Mansi Somaiya, Dr. Dr. R. M. Kamath

10. Relationship between severity of alcohol dependence and co-dependency and enabling behavior: L.P. Shah award Dr. Neha Shah, Dr. Vidya Girishankar, Dr. Alka. A. Subramanyam, Dr. R. M. Kamath

**संशोधनात्मक प्रकल्प:**

A) Dissertations:

1. Phenomenology and suggestibility in patients with Dhat syndrome: Dr. Sanil Sinhasan, Dr. Deoraj Sinha
2. Study of phenomenology, family factors, functioning and quality of life in childhood and adolescent depression: Dr. Rajesh Narwade, Dr. Alka. A. Subramanyam
3. Study of cognition and mood in subjects with Premenstrual syndrome: Dr. Vibha Kamble, Dr. Henal. R. Shah
4. Illness perception, stigma and adherence in adolescents diagnosed with Attention deficit / hyperactivity disorder (ADHD): Dr. Pratik Surandashe, Dr. R. M. Kamath
5. The role of spiritual well being and religious coping in psychiatric morbidities associated with Breast cancer: Dr. Swati Shelke, Dr. Jahnavi Kedare
6. Pre and post treatment clinical scales and MR Spectroscopy changes in drug naïve children with

ADHD: Dr. Rithwick Chatterjee, Dr. Alka. A. Subramanyam, Dr. Bhakti Yeragi (Radio)

7. A study on the effect of sleep training programme in children with ADHD: A comparative prospective study: Dr. Allauki Dani, Dr. Henal . R. Shah

8. Comparision between neurocognitive insight, objective cognitive performance and associated factors in patients with schizophrenia – a cross sectional study: Dr. Sachin Baliga, Dr. R. M. Kamath

B) Original Research (Other) completed

1. A retrospective chart analysis of deaddiction proforma, to study demographic data, pattern of substance use and psycho-socio-occupational impairments in patients coming to psychiatry OPD of a tertiary care hospital for deaddiction: Dr. Bhagyashree Giakwad, Dr. Shilpa Adarkar, Dr. Jahnavi Kedare, Dr. Alka. A. Subramanyam

2. Study to compare the use of smartphone for learning among PG medical students and interns, between an urban municipal medical college and urban private medical college: Dr. Snehal Todkar, Dr. Henal. R. Shah

3. Effects of mindfulness and lifestyle modification on ageing: Dr. Bhagyashree Giakwad, Dr. Dimple Dadarwala, Dr. Alka. A. Subramanyam

4. Study to assess substance use and prescription drugs in elderly and factors influencing this use and associated psychological comorbidities- Dr. Ashwini Mule, Dr. Alka. A. Subramanyam

C) Original Research (Other) on going

1. Family intervention in Schizophrenia: Impact on attitude towards mental illness, expressed emotions and care giving: Dr. Allauki Dani, Dr. Henal. R. Shah, Dr. Shipra Singh, Dr. Delnaz Palsetia, Dr. Pooja Misal

2. Subclinical hypothyroidism and depression: Dr. Rithwick Chatterjee, Dr. Alka. A. Subramanyam, Dr. Ahutosh (Endo)

3. Role play as intervention in schizophrenia to evaluate it effects on expressed emotions: Dr. Akshay Sarode, Dr. Jahnavi Kedare

4. Study of effect of psychoeducation on primary caregivers of substance use disorder inpatient- Dr. Swapnil Karwande, Dr. Shilpa Adarkar, Dr. Deoraj Sinha

भविष्यातले उपक्रम :

- बालमानसिक आरोग्य मध्ये फेलोशीप
- विशेष सुविधांचे मजबूतीकीकरण
- रुग्णालयातील इतर विभागांना देण्यात येणाऱ्या मानसोपचार सुविधांचे

मजबूतीकीकरण

संपर्क करा : ओ .पी .डी .१३

मनोविकृतीशास्त्र विभाग

टी . एन . एम. सी आणि बी. वाय .एल . नायर हॉस्पिटल .

डॉ ए .एल .नायर रोड , मुंबई सेंट्रल ,

मुंबई ४००००८

फोन न :०२२ २३०२७६३१

वेळ - सकाळी ९ ते दुपारी ४

## सामाजिक वैद्यकशास्त्र विभाग

सामाजिक वैद्यकशास्त्र विभागाची सुरूवात १९५६ साली झाली. आणि पुढे अनेक वर्षे विभागाचा विस्तार होत राहिला. १९५९ ते १९६५ या दरम्यान ऑर्थर रोड येथील स्विपर कॉलनीमधील रहिवाशाकरिता सर्वसमावेशक अशा वैद्यकिय सेवा देण्याची सुरूवात झाली. त्यावेळेस डॉ. वि.एन. फणसे हे विभागप्रमुख होते. १९६६ पासून डॉ. सरोज झा यांनी प्राध्यापक व विभाग प्रमुख म्हणून कार्य केले. साधारणत: १९७७ पासून मुंबई विद्यापिठाने अभ्यासक्रमात बदल केले आणि रोगप्रतिबंधक आणि सामाजिक औषधाशास्त्र अभ्यासक्रम पाठयक्रमासह प्रात्याक्षिक असा अभ्यास करण्यास सुरूवात झाली.

राष्ट्रीय टोपीवाला वैद्यकिय महाविद्यालयास तीन (३) फिरत्या स्वास्थ्य चिकित्सेकरिता बसेस केंद्रसरकारच्या रिओरियेंटशन ऑफ मेडिकल एज्युकेशन योजनेअंतर्गत १९७८ मध्ये प्राप्त झाल्या. या करिता गलिच्छ वस्ती म्हणून मालाड येथील रामटेकनगर दत्तक म्हणून घेण्यात आले.

साधारणत: १९८०-८१ मध्ये पूर्णपणे शिवाजीनगर येथे नागरी स्वास्थ्य केंद्र सुरू करण्यात आले. त्यानंतर १९८३ साली चिताकॅम्प येथे नागरी स्वास्थ्य केंद्र सुरू झाले.

डॉ. (सौ.) नलिनी पै यांनी १९८३ ते १९९८ पर्यंत विभागप्रमुख म्हणून कार्य केले. त्यानंतर डॉ. ई.ई. डॅनियल यांनी १९९८ ते २००१ या दरम्यान विभागप्रमुख म्हणून कार्य केले. वर्ष २००१ ते २००९ या दरम्यान डॉ. आर.वाय. आरस या विभागप्रमुख आणि

प्राध्यापक म्हणून कार्यरत होत्या. त्यानंतर १ जुलै २००९ पासून डॉ. एस.आर. सुर्यवंशी यांनी प्राध्यापक आणि विभागप्रमुख म्हणून कार्यभार सांभाळला आहे.

**कर्मचारी -**

| | |
|---|---|
| १. डॉ. सुदाम आर. सुर्यवंशी | प्राध्यापक व विभागप्रमुख |
| २. डॉ. अनिता जी. शेनॉय | अतिरिक्त प्राध्यापक |
| ३. डॉ. अभिराम एम. कसवे | अतिरिक्त प्राध्यापक |
| ४. डॉ. आरमायटी देहमुबेद | सहयोगी प्राध्यापक |
| ५. डॉ. मंगला बेटे | सहयोगी प्राध्यापक |
| ६. डॉ. एस.जी. जैन | सहाय्यक प्राध्यापक |
| ७. डॉ. यास्मीन काझी | सहाय्यक प्राध्यापक |
| ८. डॉ. जर्नादन बंडी | सहाय्यक प्राध्यापक |
| ९. डॉ. ज्ञानेश्वर एम. गजभरे | सहाय्यक प्राध्यापक |

**स्थळ -**

विभाग - सामाजिक वैद्यकशास्त्र विभाग,
१ ला मजला, महाविद्यालय इमारत,
टो.रा. वैद्यकिय महाविद्यालय आणि बा.य.ल. नायर धर्मा. रूग्णालय,
मुंबई - ४०० ००८.
दुरध्वनी क्र. (०२२) २३०२०५४३
संकेतस्थळ – psmtnmc@gmail.com

संग्रहालय आणि शिकवणी वर्ग - तळमजला, महाविद्यालय इमारत

सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळा - खोली क्र. ५१६, ५ वा मजला महाविद्यालय इमारत

विभागीय ग्रंथालय - खोली क्र. ५१६, ५ वा मजला महाविद्यालय इमारत

**उप विभाग -**

सामाजिक वैद्यकशास्त्र विभागास ३ भागात विभागण्यात आले आहे.

१. शिवाजीनगर नागरी स्वास्थ्य केंद्र

स्थळ - अहिल्याबाई होळकर मार्ग, शिवाजीनगर मुंबई – ४३.

कर्मचारी - १ अतिरिक्त प्राध्यापक, २ सहाय्यक प्राध्यापक

निवासी डॉक्टर प्रथम वर्ष - ५, व्दितीय वर्ष - ५, तृतीय वर्ष – ४.

२. चिताकॅम्प नागरी स्वास्थ्य केंद्र

स्थळ - चिताकॅम्प ट्राम्बे पोलिस स्टेशनच्या मागे, ट्राम्बे, मुंबई

कर्मचारी - १ अतिरिक्त प्राध्यापक, २ सहाय्यक प्राध्यापक

निवासी डॉक्टर - प्रथम वर्ष - ५, व्दितीय वर्ष - ५ तृतीय वर्ष – ३.

ग्रामिण स्वास्थ्य प्रशिक्षण केंद्र

१. अनुकंप केंद्र (प्रसाद चिकित्सालय) गणेशपूरी, ता. भिवंडी जि. ठाणे.

२. प्राथमिक स्वास्थ्य केंद्र, पारोळ, ता. वसई जि. ठाणे.

३. प्राथमिक स्वास्थ्य केंद्र, भाताने, ता. वसई जि. ठाणे.

**वेळा -**

बाहयरूग्ण विभाग - सकाळी ०९.३० ते दूपारी ०३.३०

विभाग - सकाळी ०९.३० ते दुपारी ०४.३०

नोंदणी हि उपचार सेवेसाठी गरजेची असून १४ दिवसांकरिता ग्राहय आहे.

**प्रशिक्षणाची सोय -**

| **अ.क्र.** | **अभ्यासक्रम** | **एम.सी.आय. मान्यता** | **एम.यु.एच.एस. मान्यता** |
|---|---|---|---|
| ०१. | एम.बी.बी.एस. | मान्यता प्राप्त | मान्यता प्राप्त |
| ०२. | एम.डी. (पि.एस.एम.) | मान्यता प्राप्त | मान्यता प्राप्त |
| ०३. | डिप्लोमा इन पब्लीक हेल्थ | मान्यता प्राप्त | मान्यता प्राप्त |
| ०४. | पि.एच.डी. (सामाजिक वैद्यकशास्त्र) | मान्यता प्राप्त | मान्यता प्राप्त |

**साई आणि विशेष सुविधा –**

१. शिक्षण (शिक्षण आणि प्रशिक्षण)

**पदवीपूर्व**

| | |
|---|---|
| एम.बी.बी.एस. | पि.एस.एम. |
| बि.ओ.टी.एच. | एम.एस.सी. नर्सिंग |
| बि.पी.टी.एस. | इटर्नशिप |
| बि.ए.एस.टी. | एक्सटर्नशिप |

**पदवीनंतर**

एम.डी. (पि.एस.एम.)

डी.पी.एस.

एम.पी.एच.

पि.एच.डी. कोर्स

एम.एस.सी. नर्सिंग

**२. रूग्ण सेवा**

१. सर्वसाधारण बाहय रूग्ण सेवा

२. विशेष सेवा

| **प्रसुतीपूर्व तपासणी** | **लसिकरण चिकित्सा** |
|---|---|
| ५ वर्षाखालील मुलांची तपासणी | आ.सी.टी.सी. सेंटर |
| स्त्री स्वास्थ्य चिकित्सा | शालेय स्वास्थ्य सेवा |
| पुरूष स्वास्थ्य चिकित्सा | परिसरात स्वास्थ्य शिबिरे |
| जेष्ठ नागरिकांसाठी चिकित्सा | महानगरपालिका कर्मचारी स्वास्थ्य तपासणी सेवा |

**३. प्रयोगशाळा तपासणी –**

१. नियमीत तपासण्या

२. थुंकी (आर.एस.टी.सी.पी.)

३. एच.आय.व्ही./आर.टी.आय./एस.टी.आय. तपासण्या.

४. स्वास्थ्य शिक्षण/प्रदर्शनी

५. व्यवसायाभिमुख प्रशिक्षण कार्य

६. विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय कार्यक्रमांचे आयोजन

**पुरस्कार आणि ध्येयप्राप्ती –**

गणेशपूरी येथे ग्रामीण स्वास्थ्य केंद्राची स्थापना एम.यु.एच.एस. तर्फे पि.एस.डी. अभ्यासक्रमाकरिता विभागास मान्यता, विभागास आय.एस.ओ. ९००१:२००० प्रमाणपत्र प्राप्त झाले.

**विशेष कार्य**

सॅटेलाईट डिसीझेस सर्व्हिलेन्स युनिट

पुरूष स्वास्थ्य चिकित्सा

सुरक्षा चिकित्सा

आय.सी.टी.सी.

**संशोधन प्रकल्प**

दिशा प्रकल्प (युनिसेफ आणि एमडॅक्स)

आयडीएसपी (एम.ओ.एफ. डब्लू.)

चार्म प्रकल्प (डिबीटी आणि एम.आय.आर.आर.एच.)

पदवीपूर्व विद्यार्थ्यांचे संशोधन प्रकल्प (आय.सी.एम.आर.)

डी पी एच विद्यार्थ्यांचे शोध निबंध

एम.डी. विद्यार्थ्यांचे शोध निबंध

पि.एस.डी. विद्यार्थ्यांचे शोध निबंध

एम.पी.एच. विद्यार्थ्यांचे संशोधन प्रकल्प (टि.आय.एस.एस.)

एम.एस.सी. नर्सींग शोध निबंध

**इतर कर्मचारी वर्ग**

| पद | संख्या |
|---|---|
| समाज विकास अधिकारी | ०३ |
| प्रयोगशाळा तंत्रज्ञ | ०२ |
| प्रयोगशाळा परिचर | ०२ |
| लिपिक | ०१ |

| | |
|---|---|
| रेकॉड सहाय्यक/भांडार सहाय्यक | ०३ |
| शिपाई/कर्मचारी/आयाबाई | ०८ |
| स्वच्छक | ०३ |

## हृदयरोगशास्त्र विभाग

| | |
|---|---|
| प्राध्यापक व विभाग प्रमुख | डॉ. अजय एस. चौरसिया |
| अतिरिक्त प्राध्यापक | डॉ. जयवंत म. नवाले |
| सहाय्यक प्राध्यापक | डॉ. संदिप न. पाटील |
| सहाय्यक प्राध्यापक | डॉ. राजेंद्र चव्हाण |
| सहाय्यक प्राध्यापक | डॉ. दिग्विजय नलावडे |
| सहाय्यक प्राध्यापक | डॉ. निखिल बोरीकर |

हृदयरोग चिकित्सा विभागात सर्वप्रकारच्या हृदयरोगांवर उपचार पुरविले जातात. या विभागात सुसज्ज हृदयरोग अतिदक्षता विभाग, अद्यावत कार्डियाक कॅथटरायजेशन लॅबोरेटरी तसेच नवीन व पुनर्तपासणीसाठी येणा-या रूग्णांसाठी बाहयरूग्ण विभाग उपलब्ध आहेत.

या विभागात हृदयरोगांच्या निदान व उपचारांसाठीच्या सुविधा जसे कोरानरी ॲंजियोग्राफी, कोरानीर ॲंजियोप्लास्टी आणि स्टेंटिग, व्हालव्युलोप्लास्टी (एओर्टीक, मायट्रल, पल्मनरी, ट्रायकस्पीड) पेसमेकर इंप्लांटेशन (अत्याधुनिक प्रकार जसे ए.आय.सी.डी., सी.आर.टी., सी.आर.टी.डी. इत्यादी)

डिव्हाइस क्लाजर (ए.एस.डी., व्ही.एस.डी., पी.डी.ए., आर.एस.ओ.व्ही.)

कोआरक्टोप्लास्टी आणि स्टेंटिग (रिनल आर्टेरी स्टेंटिग) व्हेना कॅव्हा फिल्टर.

या विभागात गरीब रूग्णांसाठी २४ तास सुविधा पुरविली जाते. तसेच हृदयरोगावरील तातडीच्या उपचारांसाठी हा विभाग सदैव तत्पर आहे.

या विभागात हृदयरोगांवरील उपचारांसाठी खालील अत्याधुनिक तंत्रज्ञान उपलब्ध आहे.

- रोटेशन्स अथेरेक्टॉमी-कॅल्सीफिक व कठिण ब्लॉकेजेससाठी.
- ओ.सी.टी. - हृदयातील ब्लॉकेजसची तसेच स्टेंटची अचूक तपासणी
- आ.ए.बी.पी. - रक्तदाब कमी असलेल्या हृदयरोग्यांसाठी.

**शैक्षणिक उपक्रम** -

या विभागात डी.एम. कार्डिओलॉजी प्रशिक्षणार्थीसाठी दर आठवडयाला विविध शैक्षणिक उपक्रम घेण्यात येतात. ३ डी.एम. व ३ बी.पी.एम.टी. विद्यार्थ्यांना दर वर्षी प्रवेश देण्यात येतो. त्याचप्रमाणे पदवीपूर्व व पदव्युत्तर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन देण्यात येते.

**ग्रंथालय** -

हदयरोगाशी संबंधीत अत्याधुनिक पाठयपुस्तके तसेच राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर नावाजलेल्या हृदयरोगाशी संबंधित नियतकालिकांनी सुसज्ज ग्रंथालय उपलब्ध आहे.

## मज्जातंतू विभाग

**मज्जातंतू विभागाची माहिती** -

**१) ठिकाण** - पहिला मजला, एम. ईमारत, पटेल कंपाऊंड.

**२) इतिहास** -

* मज्जातंतू विभागाची स्थापना १९६३ साली करण्यात आली. आणि परिपूर्ण मज्जातंतूशास्त्र केंद्राची स्थापना १९८३ साली करण्यात आली. तेव्हापासून विभागाने रूग्णांची काळजी घेणे, शिक्षण तसेच संशोधनाच्या बाबतीत प्रगती केलेली आहे.

* मज्जातंतूशास्त्र विभागामध्ये सर्व मज्जातंतूच्या आजारांवर काळजी घेतली जाते.

* प्रत्येक सोमवारी अपस्मार बाहयरूग्ण विभाग सुरू आहे.

- महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाअंतर्गत चालविण्यात येणारा पदव्युत्तर अभ्यासक्रम DM (Neurology) विभागामध्ये सुरू आहे.
-

३) विभागातील शिक्षक कर्मचारीवृंद -

१) डॉ. राहूल चकोर - प्राध्यापक व विभागप्रमुख

२) रिक्त - सहयोगी प्राध्यापक

३) डॉ. हरेशकुमार भारोटे - सहयोगी प्राध्यापक

४) विभागांतर्गत सेवा -

मज्जातंतू विकारांवरील रूग्णांना उपचारपध्दती

तपासणी - ई.ई.जी, व्हिडीओ ई.ई.जी. आणि ई.एम.जी., एन.सी.एस. यंत्राव्दारे केली जाते.

५) विशेष बाहयरूग्ण सेवा -

सोमवार - दुपारी ०१.०० ते ०३.००

मंगळवार - सकाळी ०९.०० ते १२.००

गुरूवार - सकाळी ०९.०० ते १२.००

६) विभागाच्या कामाच्या वेळा -

सोमवार ते शुक्रवार - सकाळी ०९.०० ते दुपारी ०४.००

शनिवार - सकाळी ०९.०० ते दुपारी १२.३०

रविवार व सार्वजनिक सुट्टी बंद

७) दुरध्वनी क्रमांक - (०२२) - २३०२७५०९

८) विभागामध्ये चालविले जाणारे अभ्यासक्रम -

* पदव्युत्तर अभ्यासक्रम - डी.एम. (न्युरोलॉजी) प्रत्येक वर्षाला एक विद्यार्थी, कालावधी ३ वर्ष सध्या विभागात तिन विद्यार्थी शिकत आहेत.

* एम.डी. (औषोधोपचारशास्त्र) मज्जातंतूशास्त्र विभागामध्ये प्रत्येक वर्षी अंदाजे १५ विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले जाते.

* एम.डी. (मनोपचाशास्त्र), मनोपचाशास्त्र डिप्लोमा मधील प्रत्येक वर्षी अंदाजे १८ विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले जाते.

* बी.पी.एम.टी. (मज्जातंतूशास्त्र) प्रत्यक वर्षी अंदाजे २ विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले जाते.

* डॅबेटोलॉजीमध्ये प्रत्येक वर्षी अंदाजे २ विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले जाते.

९) भविष्यकाळातील योजना

बाहयरूग्ण विभाग वृध्दिंगत करणे.

## मूत्रपिंडोपचारशास्त्र विभाग

**मूत्रपिंडोपचारशास्त्र विभागाची माहिती:**

मूत्रपिंडोपचारशास्त्र विभाग मुख्यत्वेकरून मूत्रपिंडाशी संबधित व मूत्रासंबधी आजारावर उपचार करण्याचे कार्य करते. मूत्रपिंडोपचारशास्त्र विभाग हा **हेमोडायलिसिस सारखी** जीवनदान देण्यासारखी सेवा सतत २४ तास देत असून डायलिसिस विभाग हा सर्वोकृष्ट साधनांनी सुसज्ज असा विभाग आहे. **किडणी प्रत्यारोपण शस्त्रकिया करण्यासाठी प्रमाणपत्र** आरोग्य सेवा संचालनालयातून देण्यात आले असून किडणी प्रत्यारोपणशस्त्रकिया नियमितपणे पार पाडण्यात येतात.अतिदक्षता मूत्रपिंडोंपचार कक्षामध्ये अतिदक्ष मूत्रपिंड रुग्णाची विशेष काळजी घेण्यात येते. जिवंत नातेसंबधातील मूत्रपिंडरोपणाबरोबरच मृत मेंदू असलेल्या माणसाच्या शरीरातील किडणी प्रत्यारोपण शस्त्रक्रीया ज्या वेळी किडणी उपलब्ध असेल तेव्हा करण्यात येतात. विभागात ४० खाटा रूग्णांसाठी उपलब्ध आहेत. विभागातून आठवडयाला तीन वेळा बाहयरूग्ण विभाग चालविले जातात त्यापैकी दोन वेळा सर्वसामान्य मूत्रपिंड रूग्णांसाठी व एका वेळेस फक्त मूत्रपिंडरोपण शस्त्रक्रीया झालेल्या रूग्णांसाठी विशेष बाहयरूग्ण विभाग चालविला जातो.

विभागामार्फत गरीब व गरजू रूग्णांसाठी विशेष सेवा दिल्या जातात: वेगवेगळया कक्षामध्ये रूग्णांना दाखल करून त्यांच्या चाचण्या करून त्यांच्यावर उपचार करण्यात येतात, मूत्रपिंड बायोप्सी,प्लाझ्मामाफेरेसिस, एक्यूट पेरीटोनियल डायलिसिस.

मूत्रपिंडोंपचार शास्त्र विभागास **डी.एम.नेफ्रोलॉजी** कोर्स चालू करण्यासाठी मेडिकल काउसिल ऑफ इंडिया यांच्याकडून परवानगी पत्र प्राप्त झाले असून २०१३ पासून विदयार्थी दाखल होतात.

**PARTICULARS OF ORGANISATION , FUNCTION AND DUTIES**

| अ.क्र. | पद | उपलब्ध जागा | भरलेल्या जागा | कार्ये |
|---|---|---|---|---|
| 01 | अध्यापकीय कर्मचारी | 03 | 03 | रूग्णांची काळजी घेणे कार्यालयीन कामकाजाची पूर्तता शोधकार्य शैक्षणिक कार्याची पूर्तता करणे |
| 02 | निवासी वैदयकीय अधिकारी | 09 | 07 | विभागाच्या कार्यपूर्ततेचा कणा असून 24 X 7 दिवस कार्यरत असतात. |
| 03 | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | 08 | 08 | हेमोडायलिसिस सेवा देणे, वॉटर ट्रीटमेंट प्लान्ट व डायलायझर स्वच्छता कक्षाची काळजी घेणे. |
| 04 | परीचारीका: | | | डायलिसिस व मूत्रपिंडरोपण शस्त्रक्रीया झालेल्या रूग्णांची सर्वतोपरी काळजी घेणे |
| | कृत्रिम मूत्रपिंडोपचारशास्त्र कक्ष | 13 | 13 | |
| | किडणी प्रत्यारोपण कक्ष | 05 | 05 | |
| 05 | कक्ष परीचर | 04 | 03 | |
| 06 | सफाईकामगार | 04 | 01 | |
| 07 | लिपिक | 01 | 01 | |
| 08 | हमाल | 01 | 01 | |

**PROCEDURE FOLLOWED IN DECISION MAKING PROCESS**

**रूग्णसेवा:**

रूग्णांची सर्व माहिती निवासी वैदयकीय अधिका-यामार्फत घेतली जाते व ती सर्व उपलब्ध माहिती अध्यापकीय अधिका-यांना दिली जाते व त्यांच्यामार्फत रूग्णांची प्रत्यक्ष पाहणी करून पुढील उपचार योजना करण्यात येतात

अध्यापकीय अधिकारी दररोज नियमितपणे कक्षामधील दाखल रूग्णांची पाहणी

करण्यात येते.

**विभागाच्या अतिविशेष सेवाः**

| अ.क्र. | सेवा | तपशील |
| --- | --- | --- |
| 01 | कनव्हेन्शल हेमोडायलिसिस | डायलिसिस सेवा तीन पाळयांमध्ये 24 तास |
| 02 | तात्पुरते हेमोडायलिसिस कॅथेटर प्लेसमेंट | |
| 03 | डबल कफड आणि टनेल्ड हेमोडायलिसिस कॅथेटर | |
| 04 | एक्यूट पेरीटोनियल डायलिसिस | |
| 05 | कंटीन्यूयस एमब्यलेटरी पेरीटोनियल डायलिसिस | |
| 06 | टेकंऑफ कॅथेटर प्लेसमेंट ऍट बेडसाईड | |
| 07 | सीएपीडी सेवा | ज्या वेळी रूग्ण सीएपीडी बॅग विभागातून नेण्यास येतात त्या वेळी [वेळ दूपारी 2 ते 4 , |
| 08 | मुत्रपिडोपचारशास्त्र कक्षात दाखल होणारे रूग्ण | स्त्री विभाग किडणी प्रत्यारोपण विभाग अतिदक्षता किडणी विभाग |
| 09 | बाहयरूग्ण विभाग | 02- सर्वसामान्य रूग्णांसाठी<br>01- मूत्रपिंडरोपण शस्त्रक्रीया झालेल्या रूग्णांसाठी |
| 10 | प्लाझ्माफेरेसिस | |
| 11 | चारकोल हेमोपरफ्युजन | |
| 12 | मूत्रपिंड बायोप्सी | |
| 13 | किडणी प्रत्यारोपण | जिवंत नातेसंबधातील व मृत मेंदू असलेल्या माणसाच्या शरीरातील किडणी प्रत्यारोपण |
| 14 | रूग्णांसाठी विशेष माहिती वर्ग [कायमस्वरूपी डायलिसिसची आवश्यकता असणारे रूग्ण व किडणी प्रत्यारोपण शस्त्रक्रीयेला सामोरे जाणारे रूग्ण] | सोमवार वेळ दुपारी 2 ते 4 |

**<u>NORMS SET BY IT FOR DISCHARGE OF ITS FUNCTION</u>**

हेमोडायलिसिस, पेरीटोनियल डायलिसिस, मूत्रपिंड बायोप्सी, किडणी प्रत्यारोपण शस्त्रक्रीयेसाठी (प्रात्पकर्ता व दाता) आवश्यक चाचण्या पेपर, रूग्णांची सर्व माहिती
घेणे, नेफ्रोटिक सिड्रोम रूग्णांची काळजी घेणे, प्रफोरमा इत्यादी मसुदे[प्रोटोकोल] तयार
केलेले आहेत त्याची पूर्तता वरीष्ठ व कनिष्ठ वैदयकीय अधिका-याकडून करण्यात येते.

**PARTICULARS OF THE FACILITIES AVAILABLE TO CITIZENS FOR OBTAINING INFORMATION**

विभागाची सर्व माहिती खालील दूरध्वनी क्रमांकावर उपलब्ध होऊ शकते.

| | | |
|---|---|---|
| कार्यालय | - | 022-23027682 |
| कृत्रिम मूत्रपिंडोपचारशास्त्र विभाग | - | 022-23027330 |

## जाठरआंत्रिक विभाग

जाठरआंत्रिक विभागाची प्रथमत: भारतात स्थापना ही डॉ. एफ.पी. एन्टिया यांनी सन १९५४ ला केली सुरूवातीपासूनच या विभागाने उत्तम वैद्यकिय सुविधा, एन्डोस्कोपिक कार्य आणि महत्वाचे संशोधनात्मक माहिती याप्रकारे योगदान दिलेले आहे. डॉ. एफ.पी. एन्टिया यांच्या सन १९७४ मध्ये विभागप्रमुख व प्राध्यापक म्हणून निवृत्तीनंतर डॉ. एच.जी. देसाई, डॉ. आर.एच. कार्लो, डॉ. शोभा भाटिया यांनी विभागाचा कार्यभार उत्कृष्ठ रित्या १३ मार्च २००६ पर्यंत सांभाळला. सध्यस्थितीत डॉ. प्रविण राठी हे विभागाचे प्रमुख आहेत.

जाठरआंत्रिक विभाग -

१. अभ्यासक्रम - विद्यार्थी प्रवेश २ विद्यार्थी प्रती वर्ष वाढविणे.

२. जाइरआंत्रिक रोग ओ.पी.डी. क्र. १७, बुधवार व शुक्रवार आठवडयात दोन वेळा सकाळी ८ ते ११ असते. ही ओ.पी.डी. ओ.पी.डी. इमारतीच्या १ ल्या माजल्यावर स्थित आहे.

३. विभागांतर्गत असलेले कक्ष महिलांसाठी कक्ष क्र. १८ व पुरूषांसाठी कक्ष क्र. ३१, ७वा मजला.

४. शिक्षक वर्गामध्ये १) प्राध्यापक व प्रमुख डॉ. प्रविण एम. राठी २) डॉ. रविंद्र सुरूडे ३) डॉ. समित जैन ४) डॉ. कैस कॉन्ट्रक्टर यांचा समावेश करण्यात आला.

५. ऑपरेशन विभागात - एन्डोस्कोपी संरचना हि ओ.पी.डी. इमारत ७ वा माळा रूम नं. ७१७ येथे स्थित आहे.

६. अति आवश्यक सेवेत - अति आवश्यक सेवेत गॅस्ट्रोइन्टेस्टिनल इमारत आणि कोलंजायटिस या प्रकिया २४ x ७ उपलब्ध आहेत.

उपलब्ध सेवा -

अ. डायग्निस्टिक

- अप्पर जीआय स्कोपी
- कोलोनोस्कोपी
- इ.आर.सी.पी.
- सिग्मोडिस्कोपी
- यकृत बायोप्सि
- डुओडेनल बाइल अस्पिरेत (फॉर गर्डिआसिस एन्ड कोलेस्टेरोल क्रिस्टल)

थेरेप्टिक प्रक्रिया

- इसोफेगल व्हेरिसिल स्केलोथेरपि
- इसोफेगल व्हेरिसिल बॅड लिगेशन
- इसोफेगल उायलेटेशन (फॉर इक्लासिआ ॲण्ड मॅलिग्नन्ट/बेनिंग स्टिक्चर्स)
- इसोफेगल प्रास्थेसिस प्लेसमेंट (कर्करोग ईसोफेगस)
- गॅस्ट्रीक वराइसेस इन्जेक्शन विथ ग्लु
- बिल्डिंग अल्सर इन्जेक्शन
- ऐन्डोस्कोपीक बायलरी स्पिक्टेरोटोमि ॲण्ड ड्रेनेज
- पॅनक्रियेतिक सिस्ट ड्रेनेज
- पोलिपेक्टोमि

- फोरेन बोडि रिमुवल
- पर्कुटॅनिअस ऐन्डोस्कोपिक गॅस्टोक्तोमी

अन्य सुविधा -

- इसोफेगल मॅनोमेट्री
- इसोफेगल पि.एच.मेट्री
- अनोरेक्ट्रल मॅनोमेट्री
- इ.यु.एस.
- फाय्ब्रोस्कॅन
- हाय रिजोलुशन मॅनोमेट्री
- पि.एस.मेट्री.

एन्डोस्कोपी सर्व्हिसेस -

रूग्णांना ओ.पी.डी. मध्ये माहिती व तपासणीची वेळ देण्यात येते. अप्पार गॅस्टोइंटेस्टीनल (गॅस्टोक पीज) आणि लोवर गॅस्ट्रोइंटे स्टीनल (कालोनोस्कोपी) एन्डोस्कोपीज सोमवार व शुक्रवार होतात. इ.आर.सी.पी. आणि पेरीटोनीओस्कोपी या मंगळवार व गुरूवार होतात. चार्जेस व विविध तपासण्या

| | |
|---|---|
| १. अप्पर जी.आय. स्कोपी | रू. १२५/- |
| २. कोलोनोस्कोपी | रू. २५०/- |
| ३. इआरसीपी | रू. ५००/- |
| ४. इयुएस | रू. ५००/- |
| ५. मनोमेट्री | रू. ५०/- |

विद्यार्थी सुची -

- सुपरस्पेशलिटि वैद्यकिय अधिकारी - डॉ. विनय जान्वर आणि डॉ. सुनिल पवार
- तृतीय वर्षातील विद्यार्थी - डॉ. निखिल सोनथलिया आणि डॉ. विनय पवार
- व्दितीय वर्षातील विद्यार्थी - डॉ. सुहास उद्गीरकर आणि डॉ. संजय चंदनानि
- प्रथम वर्षातील विद्यार्थी - डॉ. शुभम जैन आणि डॉ. रवि थनगे.

सी.एम.ई. व परिषद -

- जाठरआंत्रिक विभागातर्फे डॉ. एफ.पी. एन्टिया यांच्या स्मृतिप्रित्यर्थ परिषद, प्रमुख जाठररोग तज्ञ यांच्या उपस्थितत आयोजित करण्यात आली. परिषदचे प्रमुख वक्ते मा. डॉ.आर.के. गोयल (अमेरिका), डॉ.जि.एन.जे. टाल्गैट (एमस्टरडैम), डॉ. सोहेन्द्रा (जर्मनी), डॉ. एच.जी. देसाई, डॉ. सी.एस. पीचुमोनिर (अमेरिका) डॉ. मो.रेला (यु.के.),

डॉ. प्रफुल देसाई (इंडिया), डॉ. अरून सानियाल (अमेरिका), डॉ. वाय.के. चावला (इंडिया)

- हेपॅटोलोजि परिषद २०१५.
- राष्ट्रीय पातळीवरील पदवित्तर सुधारणा आणि वैद्यकिय शिक्षण परिषद, आयोजित करण्यात आल्या आहेत. या परिषदेअंतर्गत जाठरआंत्रिक विषयातील वैज्ञनिक संपर्क आणि संशोधन पध्दती या गोष्टींवर विचारविनिमय झाला.

विभागातील निर्णय प्रक्रिया -

- जाठरआंत्रिक विभागातील सर्व निर्णय हे विभागाचे प्राध्यापक व प्रमुख डॉ. प्रविन एम. राठी हेच घेतात.

## टो. रा. वैद्यकीय महाविद्यालय व बा. य. ल. नायर धर्मा. रूग्णालय

## आंतरासर्ग विभाग

**वैद्यकिय सेवा –**

1. विभागात आलेल्या रूग्णांची विषेश काळजी घेणे
2. रूग्णांच्या प्रयोगशाळेतील खास चाचण्या (किरणोत्सर्गीय चाचण्या)
3. रूग्णांची पुर्नतपासणी व विषेश उपचार
4. आंतरासर्गीय विकारातील रूग्णालयीन व मुलभूत संशोधन

**रूग्ण सेवा –**

आंतरासर्ग विभागातर्फे रूग्णांची शारिरीक तपासणी, विविध प्रयोगशालेय चाचण्या, उपचार पध्दती व रूग्णांचा दिर्घकाळ पाठपुरावा केला जातो.

**विशेष चिकित्सा –**

आंतरासर्ग विभाग हा अतिविषेश विभाग असून खाली निर्देषित केलेले बाहय रूग्णविभाग

हया विभागाकडून आयोजित केले जातात.  हया वैशिष्ठयेसाठी शहरातील, राज्यातील आणि कधी कधी सर्व भारतातील हयाच्या संदर्भातील रूग्णांसाठी संपर्क साधला जातो.

| **दिवस** | **सकाळी 9 ते 12** | **दुपारी 1.30 ते 3.30** |
|---|---|---|
| सोमवार | मधुमेह , कंठग्रंथी | मधुमेह पूर्नतपासणी |
| मंगळवार | आंतरासर्ग | ---- |
| बुधवार | कंठग्रंथी | ---- |
| गुरूवार | मधुमेह | मधुमेह पूर्नतपासणी |
| शुक्रवार | विशेष काळजी | ---- |
| शनिवार | आंतरासर्ग युवा अवस्था  आणि वाढ | ---- |

**आंतरासर्गीय चिकित्सा व वाढीबाबत चिकित्सा –**

संपूर्ण शारिरीक तपासणी व्यतिरिक्त रूग्णांच्या आहाराचा विचार करून त्या - त्या रूग्णांच्या आहाराचा विचार करून त्या - त्या रूग्णांना आहारासंबंधी मार्गदर्शन केले जाते. रूग्णांच्या आथिक परिस्थितीचा आढावा वैद्यकिय समाज सेवकांकडून घेतला जातो व त्यानुसार रूग्णांना मदत दिली जाते.

वाढ खुंटलेल्या मुलांची मानसोपचार तज्ञांकडून नियमित तपासणी केली जाते व बाल मार्गदर्शन केंद्रांकडून बुध्यांकमापन केले जाते.

आंतरासर्ग बाहय रूग्ण विभागात पियुषिका ग्रथी, अडेनल ग्रंथी, गुणसूत्र रोग, प्रजोत्पादन विकुत वैगरे रोगांचे रूग्ण तपासले जातात.

**मधुमेह चिकित्सालय –**

मधूमेहाने पिडित असलेल्या नविन रूग्णांची तपासणी दर सोमवारी व गुरूवारी सकाळी 9.00 वाजल्यापासून बाहय-रूग्ण विभागात केली जाते.  रूग्णांची सखोल तपासणी करण्यात येते.   रूग्णांची सखोल तपासणी करण्यात येते.   रूग्णाच्या आहारा विषयक आवडी निवडी लक्षात घेवून उष्मांकाची किती गरज आहे.  हे निश्चित करून योग्यता आहार सांगितला जातो.  साधारण 1 ते 1½ तास तपासल्याने तर विचार विनिमय करून उपचार पध्दती ठरविली जाते.

दर सोमवारी व गुरूवारी दुपारी 1.30 वाजल्यानंतर जुन्या रूग्णांची तपासणी केली जाते.  दर तीन महिन्यांनी रूग्णांच्या रक्तातील साखरेचे प्रमाण किती आहे याची तपासणी

केली जाते व त्यानुसार औषधात फेरफार केला जातो.

आंतरासर्ग व मधुमेहाने पिडित असलेल्या इतर कक्षातील रूग्णांना त्या त्या कक्षात जावून सखोल तपासले जाते. कोणत्याही दिवशी रूग्णांना मपासणीसाठी पाठविण्यात येते. शस्त्रकिरया करण्यात येणा-या मधुमेहाने पिडित असलेल्या सर्व रूग्णांची देखभाल हयाच विभागाद्वारे केली जाते.

बालवयात झालेल्या मधुमेह रूग्णांची आणि मधुमेही गरोदर स्त्रियांची विशेष काळजी घेतली जाते.

